


संत तुकाराम

(अभंग दर्शन, चिंतन, निरुपण)

वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे..
पक्षीही सुस्वरे आळविती.

लेखक
सुरेश पंदारे

संत तुकाराम (अभंग दर्शन, चिंतन, निरुपण)

या पुस्तकाचे ई पुस्तक, ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना, ई स्वरुपात, विनामूल्य, उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक श्री सुरेश पंदारे यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन व विनामूल्य वितरण करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही या पुस्तकाचे प्रकाशक नरवीर प्रकाशन चे श्री. विलास पायगुडे यांचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील आपले अभिप्राय श्री सुरेश पंदारे यांना 93721 99100 या क्रमांकावर कळवावे.

धन्यवाद

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

Whatsapp : 9987737237

संत तुकाराम

(अभंग, चिंतन)

लेखक

श्री. सुरेश पंढारे

नरवीर प्रकाशन

* **लेखक :**
श्री. सुरेश पंदारे
लक्ष्मी गंगा सोसायटी, सिंहगड रस्ता, सनसिटी पुणे - ५१
मोबाईल : ९३७२१९९१००

* **© श्री. सुरेश पंदारे**

* **प्रकाशक :**
विलास पायगुडे
नरवीर प्रकाशन, पुणे
सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे ४११ ०५१
मोबा. ९३०७५३९४२४

* **मुखपृष्ठ**
नितीन चांगदेव सोनावणे,
पिंपळे-गुरव, पुणे
मोबा. ८६६८८७९६४८

* **मुद्रक :**
ए. आर. प्रिंटर्स, पुणे

* **प्रथम आवृत्ती**

* **अक्षरजुळणी**
पूनम नितीन सोनावणे,
साईराज अपार्टमेंट,
पिंपळे-गुरव, पुणे
मोबाईल : ८६६८८७९६४८

* **किंमत :**
रूपये १६०/-

अर्पण पत्रिका

गुरुवर्य परम पुज्य मामासाहेब देशपांडे व
माझे आई वडिलांना अर्पण....!



कृतज्ञता

मी या प्रसंगी माझ्या कुंटुंबाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, माझी पत्नी सौ. शोभना व मुले प्रसाद, योगेश व डॉ. माधवी यांनी मला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. सौ. शामला व सौ. रश्मी व जावई निखिल खराडे या सर्वांची मी ऋणी आहे.

– सुरेश पंदारे
लक्ष्मी गंगा सोसायटी, सिंहगडरोड, सनसिटी पुणे ५१
मोबा ९३७२१९९१००

पत्ररूप प्रस्तावना

प्रिय, श्री. सुरेश पंढारे,

'संत तुकाराम... अंभग, चिंतन..' या तुमच्या पुस्तकाला मी प्रस्तावना लिहावी, अशी विनंती प्रकाशक श्री. विलास पायगुडे यांनी मला केली. ती मी लगेच मान्य केली. कारण या संताविषयाला प्रस्तावनेच्या रूपाने प्रोत्साहन देणं हे मी माझं कर्तव्य समजतो. संत तुकाराम आणि त्यांची जीवनगाथा हा समस्त मराठी भाषकांच्या जीवन प्रवाहाचा अर्थपुर्ण पण तात्त्विक असा खळखळाट आहे. या पुस्तकाच्या रूपाने त्यातील काही आचमने घेऊन त्यावर तुम्ही चांगले निरूपण केले आहे. याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन!

एकूण ५० निवडक अभंगांचे निरूपण तुम्ही प्रासादिकतेने सादर केले आहे, ही निवड करताना तुमचा साक्षेपी दृष्टिकोन लक्षात येतो. यातील बरेच अभंग खूप लोकप्रिय आहेत पण त्याचबरोबर काही अभंग असेही आहेत की, ते किर्तनकारांनी वा गायकांनी लोकप्रिय केलेले नसले तरी तुकोबांची विचारसरणी सामान्य वाचकाला मार्गदर्शक ठरणारी आहे. त्यातील जीवनाविषयक तत्त्वज्ञान, आध्यात्म विचार आणि प्रभावी सूचक उपदेश वाचकाला प्रेरित करणारा आहे. उदा. पहिलाच अभंग...

'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे..' या अभंगात तुकोबा शेवटी सांगतात. 'तुका (म्हणे) रहणे पुढा! घाण्या जुंपी जसी मूढा', पापपुण्य या विषयावर अनेक प्राचीन दार्शनिकांनी, संतांनी भाष्यकारांनी वेळोवेळी विवेचन केले आहे. पण तुकोबा सोप्या शब्दात, अगदी न शिकलेल्या माणसालाही समजेल अशा भाषेत पाप-पुण्याचा विचार मांडतात. परउपकार हे पुण्य, परपीडा हे पाप, सत्य तो धर्म, असत्य ते कर्म असे सांगताना 'संतांचा संग तोच स्वर्गवास' असे ते सांगतात. माणसाने दुसऱ्याला नेहमी आधार द्यावा, त्याला मदत करावी हे सांगणारा अभंग क्र. २९ हा फारसा लोकप्रिय नाही. पण त्यातील विचारधन संपन्न आहे. 'तुका म्हणे दिले चिंतामणीसाठी, उचित कांचवटी दंडवत' असा सरळ उपदेश तुकोबा करतात. अभंग क्र. ३० हा शेतीला पाणी कसे द्यावे याबद्दलचा आहे. अशा अभंगावरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती अशी की, तुकोबा केवळ कोरडा आध्यात्मिक उपदेश करीत नाही तर शेतकऱ्यासारख्या सर्व सामान्य माणसाच्या जीवनविषयक जाणीवांचा ते उपयोग करून घेतात.

श्री. सुरेशराव,

तुकोबांची अभंगगाथा शेकडो वर्षे मराठी माणसं वाचत आहेत, पारायणे होत आहेत. पण सध्याच्या धावपळीच्या उद्योग प्रधान व अर्थप्रधान निरर्थक जीवनाला क्षणभर विसावा हवा असेल तर तुमचे हे पुस्तक निश्चितपणे उपयोगी ठरेल आणि प्रातिनिधिक स्वरूपात गाथा वाचण्याचे समाधान वाचकाला मिळेल. शुभेच्छा!

– डॉ. न. म. जोशी

मोबा. ९२२६५७५२९०



लेखकाचे मनोगत

संत तुकाराम

(समाज प्रबोधक व तत्त्वज्ञ)

अभंग चिंतन

संत तुकाराम महाराज यांची अभंगवाणी हे मराठी माणसाचे वैचारिक धन आहे. लोकमानसात घराघरात पोहचलेले हे संत कवी आहे. त्यांच्या अनेक अभंगातून जीवन विषयक विचार उमटला आहे. स्वसंवाद करणारे तुकोबा जणू समाजाशी सतत बोलत होते. तुकोबा केवळ संत आणि प्रतिभावंत कवी नव्हते तर सूक्ष्म दृष्टीने समाजाचा व मानवी जीवनाचा शोध घेणारे तत्त्वचिंतक होते.

खूप दिवसांपासून तुकोबारायांचे भक्ति व विठ्ठलरूप यांचे अभंग सोडून ज्या अभंगात त्यांनी सामान्य जणांना उपदेश केला, समाज प्रबोधन केले असे काही अभंग निवडून त्याचे संकलन व शब्दांकन करावे असे मनात सारखे येई. त्यांच्या अभंगाचे निरुपण करण्याची माझी पात्रता नाही पण या सर्व सामान्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या थोर संताचे विचार जे अभंगातून प्रकट झालेत ते मांडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. महाराजांच्याच शब्दात सांगायचे तर ''मज पामराशी काय थोर पण पायीची वहाण पायी बरी'' जास्तीत जास्त समाज व मानवी जीवनांचे कल्याण व्हावे असे जे अभंग आहेत ते संकलित करुन पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा आज मानस सिद्धीस जात आहे ही संत तुकोबारायांच्या चरणी सविनय अर्पण व नरवीर प्रकाशनचे माझे मित्र श्री. विलास पायगुडे यांना धन्यवाद!

अभंग क्र. १

सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ।।
धरी धरी आठवण । मानी संताचे वचन ।।
नेले रात्रीने ते अर्धे । बाळपण ते जरा व्याधे ।।
तुका रहणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा ।।

संत तुकाराम जीवनाचे व समाजाचे खरे अभ्यासक होते. स्वतः च्या आयुष्यात अनेक दुःखाचे प्रसंग आले. त्यातून त्यांनी हा निष्कर्ष काढला. जीवनात सुख जवा इतके म्हणजे खूप थोडे असते. दुःख मात्र प्रचंड प्रमाणात म्हणजे पर्वताप्रमाणे असते. आपण मोह–इच्छा यात सापडलो तर सुख कुठून मिळणार. आपले आयुष्य बालपणात, तारुण्यात निम्मे खर्च होते. शारिरिक व्याधीत म्हातारपण निघून जाते. संत हे निराशावादी नाहीत. पण सत्यवादी आहेत. जीवनाचे कठीण विदारक सत्य ते या अभंगातून मांडतात. दुःखावर मात करण्याचे अनेक मार्ग संतानीच सांगितले आहेत. म्हणूनच 'मन करा रे प्रसन्न । सकळ सिद्धीचे कारण' हे ते सहजगत्या सुचवतात.

***

अभंग क्र. २

तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।
मिळालिया संत संग । समर्पिता भले अंग ।।
तिर्थी भाव फळे । येथे अनाड हे वळे ।।
तुका म्हणे पाप । गेले गेल्या कळे ताप ।।

श्री तुकाराम महाराजांचा हा स्पष्टवक्तेपणा आहे. त्यात तर्कशुद्धता आहे. ते म्हणतात तीर्थक्षेत्रात असते तरी काय? देव तीर्थक्षेत्रातच राहतो हे तुम्हाला कोणी सांगितले? देव साधुसंतात व सज्ञनात पहा. त्यांच्या प्रेमात स्नान करा. तुम्हांला परमेश्वर भेटल्याचा आनंद मिळेल. सज्ञन भेदभाव करतच नाही. माऊलींच्या ज्ञानेश्वरीतील ओव्या पहा. संताबद्दल त्यांनी वृक्षाचा दाखला दिला.

जो खांडावया घाव घाली । का लावणी जयाने केली ।।
दोघा एकचि सावली । वृक्ष दे जैसा ।।

माणूस हेच देवाचे सुंदर रूप आहे. 'देव रोकडा सज्ञनी' म्हणूनच ते आवर्जून सांगतात. एका अभंगात ते म्हणतात

'तुका सांगे मूढजनां । देही देव का पहाना ।।

***

अभंग क्र. ३

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।
मृदू सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त ।।
ज्यासी आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी ।।
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।।
तुका म्हणे सांगू किती?। तोचि भगवंताची मूर्ती ।।

संतश्रेष्ठ तुकोबारायांचा हा एक प्रसिद्ध अभंग आहे. जे दुःखी आहेत. पिडीत आहेत. त्यांना जवळ करुन आपले प्रेम द्या. करुणा भाव जागृत करा. हृदयाची दारे बंद करु नका. दुसऱ्यांचे दुःख पाहून सज्जन,। संत व्यथित होतात. रंजले गांजल्यांना आपलेसे करणारेच खरे साधु संत. देवत्व त्यांच्यातच पहा. त्यांचे चित्त मऊ लोण्यासारखे अंर्तःबाह्य शुद्ध व करुणामय असते. असे संत या भगवंताच्याच मूर्ती आहेत. भगवंत व संत यात अंतर नाहीच.

ज्येष्ठ विचारवंत व तत्वज्ञ लेखक श्री. अ. ह. साळुंखे यांनी संत तुकारामांना एक तत्वज्ञ संत म्हटले आहे तसेच त्यांनी कर्मकांडावर केलेले प्रहार हे त्यांच्या विद्रोही वृत्तीचे परिमाण आहे. पुढचा अभंग पहा.

***

अभंग क्र. ४

काय बा करीसी सोवळे ओवळे।
मन नाही निर्मळ वाऊगे चि ।।
काय बा करिसी टाळ आणि मृदूंग।
जेथे पांडूरंग रंगला नाही ।।
काय बा करिसी ज्ञानाचिया गोष्टी।
करणी नाही पोटी बोलण्याची ।।
काय बा करिसी दंभ लौकिकाते।
हित नाही माते तुका म्हणे ।।

महाराज परखडपणे विचारतात, 'अरे हे सोवळे ओवळ्याचे स्तोम कशासाठी? मन जर स्वच्छ नसेल तर ह्या बाह्य गोष्टींना काय किंमत आहे?' धर्म हा अंतर्मनात नांदत असला पाहिजे. संत चोखामेळा शुद्ध व स्वच्छ होता. तरीही त्याला मंदिरात प्रवेश नव्हता. संत जनाबाईंनी म्हटले,

''चोखामेळ्याची करणी। देव केला ऋणी ।।''

पोथ्या, पुस्तकात पांडुरंग कधीच दिसणार नाही. टाळ मृदूंगातून तो कसा दिसेल? जर तुझ्या मनात कृतीत प्रामाणिक भक्ति नसेल तर? या अभंगात ते मनाच्या शुद्धतेला जास्त महत्त्व देतात. भक्ति ही शुद्ध मनाची हवी. म्हणून सोवळे पूजा अर्चा याला महत्त्व नाही.

संत तुकाराम महाराजांचा खालील अभंगात जीवन कसे जगावे याचा तर्कशुद्ध विचार आहे. हा अभंग मननीय चिंतनीय व अनुकरण करुन या उपदेशाचे पालन करावे असा आहे. मी १९९४ साली एका किर्तनात तो ऐकला व त्याने मनात जणू घर केले.

***

अभंग क्र. ५

जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी ।।
उत्तमचि गति तो एकपावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।
पर उपकारी नेणे पर निंदा । परास्त्रिया सदा बहिणी माया ।।
भूतदया गाई पशुंचे पाळण । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।
शांतिरुपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ।।
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ । परमपद बळ वैराग्याचे ।।

पैसा/धन/संपत्ती जरुर मिळवा पण त्यासाठी आपला प्रत्येक व्यवहार शील/सदाचार याला धरुन हवा. गरिबांचे शोषण करुन पैसा मिळवणे ही चोरीच. तुकोबारायांनी शांतीचा व तृप्तीचा विचार यात मांडला आहे. उदास विचारे म्हणजे धनाचा व्यय/खर्च उदासीन वृत्तीने करा. उदासीन म्हणजे दुःखी नाही तर अलिप्तता असे, करणाऱ्याला उत्तम गती मिळेल. उत्तम सुख मिळेल. दुसऱ्यांची निंदा करू नका. परहित जपा. परस्त्रीला आई बहिणीप्रमाणे वागवा. भूतमात्रांवर प्रेम करा. माऊलींनी पण म्हटले आहे, ''जे जे भेटे भूत ते ते मानी भगवंत.'' गाय / पशू यांना संभाळा. तहानलेल्यांना पाणी द्या. वडिलांना मान द्या. हाच आदर्श गृहस्थाश्रम आहे. या अभंगात जीवनाचे सार आहे. रस्किन या विदेशी तत्त्वचिंतकाने म्हटले आहे. ''संस्कृती म्हणजे सुसंस्कृत व्यक्तिंची निपज.'' महाराजांनी हाच विचार मांडून समाज प्रबोधन केले आहे. म्हणूनच ते एक तत्त्वज्ञ संत शोभतात. यानंतर एक परखड विचार व दांभिक पांडित्यावर त्यांनी आसूड ओढला आहे.

***

अभंग क्र. ६

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।
येरांनी वाहावा भार माथा ।।
स्वादल्याची गोडी देखिल्यासी नाही ।
भार धन वाहे मजुरींचे ।।
उत्पत्ति पाळण संहाराचे निज ।
जेणे नेले बीज त्याचे हाती ।।
तुका म्हणे आम्हा सापडले मूळ ।
आपणचि फळ आले हाती ।।

त्या वेळच्या कर्मठ पंडितांनी तुकोबारायांना वेदपठणाचा अधिकार नाही असे बजावले. सर्व प्रकारच्या सामाजिक व आध्यात्मिक अधिकारांपासून शूद्रांना दूर ठेवले होते. त्यांनीच म्हटले आहे वैष्णव चांभार धन्य त्याचे कूळ. माणसाची उच्चनिचता त्यांच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. जात/वर्ण याचा काय संबंध? म्हणूनच कर्मठ पंडितांना उद्देशून ते ठणकावतात. वेदांचा आत्मा जो ईश्वर, परब्रह्म ते आम्हांला कळले आहे. तुम्ही फक्त त्याची घोकंपट्टी करा व डोक्यावर भार वाहा. प्रत्यक्ष खाणाऱ्याला पदार्थाची गोडी कळते. म्हणून तुम्ही हे वेदांचे धन वाहणारे मजूर आहात. आम्हाला उत्पत्ती/स्थिती/ व विलय यांचे मूळ ज्यात आहे तो पांडुरंगच भेटला आहे. तुका आकाशाएवढा कसा आहे याचा प्रत्यय यातून येतो. वेदांचा सार जीवनात उतरवणारे असे हे संत आहेत. संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, तुकाराम हे विद्रोही संत आहेत हे डॉ. अ.ह. साळुंके ह्यांचे म्हणणे म्हणूनच पटते.

पुढील अभंग सर्वांच्या परीचयाचा आहे. संत श्रेष्ठ तुकोबाराय आध्यात्मिक पातळीवर उच्च अवस्थेला प्राप्त झाल्यानंतरचा हा अभंग असावा.

***

अभंग क्र. ७

अणु रूणेया थोकडा । तुका आकाशा एवढा ।।
गिळुनि सांडले कळिवर । भव भ्रमाचा आकार ।।
सांडिले त्रिपुटी । दीप उजळला घटी ।।
तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।।

प्रत्येक वस्तुत व्यक्तित दिव्यत्वाचा अंश मूलतःच असतो. अगदी कोळसा घ्या. त्याची सुप्त शक्ति बाहेर पडली तर तोही धगधगता निखारा बनतो. द्वैत संपून अद्वैत निर्माण झाल्यावर त्रिपुटीचा अंत होतो. अंतरी ईश्वरी दिव्यत्त्वाची ज्योत प्रकट होते. मग हा सूक्ष्म जीव परमात्म्याशी अलिंगन करतो.

सूक्ष्मत्वातून वैश्विक रूप धारण करतो. ते स्वरूप आकाशासारखे अनंत, अमर्याद होते. म्हणून त्यांनी स्वतःच्या अनुभवाची प्रचिति सांगितली. हा सामान्य तुका आता असामान्य झाला आहे. यापेक्षा वेगळे काही करण्याचे उरलेच नाही. म्हणूनच आता उरलो उपकारा करिता. सर्वांचे कल्याण हेच अंतिम लक्ष्य उरले हा विचार तत्वज्ञच करु शकतात.

***

अभंग क्र. ८

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।
मार जया अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।।
तुका म्हणे बरवे जाण । व्हावे लहानाहून लहान ।।

आपला अहंकार/मोठेपणा/सत्ता यापासून अलिप्त राहून आपण नम्रतापूर्वक कमीपणा घ्यावा म्हणजे लहान व्हावे. उदाहरणे देऊन त्यांनी सांगितले आहे.

ऐरावत रत्नाला सुद्धा घाव सोसावे लागतात. समाज जीवनात मोठे व्हायचे असेल तर कष्ट सहन करावेच लागतात. नम्र राहण्याचा उपदेश करतांना त्यांनी महापुरात प्रचंड वृक्ष वाहून जातात. पण त्यात लव्हाळे सारख्या वनस्पती तग धरतात. माणसाने आभिमान/दंभ/अहंकार/स्वतःचा मोठेपणा नेहमी बाजूला ठेवावा.

***

अभंग क्र. ९

मन करा हे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।
मने प्रतिमा स्थापिली। मने मन पूजा केली ।
मने इच्छा पुरविली । मन माऊली सकळांची ।।
मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेची दास्य ।
प्रसन्न आप-आपणास गति अथवा अधोगति ।।
साधक वाचक पंडीत । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाही नाही आनदैवत तुका म्हणे दुसरे ।।

मनाबद्दल किती सुंदर-व्यापक चिंतनीय व अनुकरणीय अभंग आहे हा! योग्य अर्थपूर्ण शब्द रचना हे संतकाव्यांचे वैशिष्ट होय. मनाबद्दल बहिणाबाई चौधरीची काव्यरचना सर्वांना परिचित आहे. सर्व खेळ मनाचा आहे. महाराज आवर्जून सांगतात. मन करा रे प्रसन्न. मन प्रसन्न नसेल तर ते प्रसन्न करा. त्यासाठी प्रत्येकाचे उपाय वेगवेगळे असू शकतात. माऊलींनी सुद्धा म्हटले मनाला जे आवडते ते त्याला दाखवित जावे. प्रसन्न मनाने सिद्धी प्राप्त होतात. एकनाथी भागवतात सिद्धीचे विस्तृत विवेचन आढळते. सिद्धी राहू द्या पण इच्छा-सुख-समाधान हे प्रसन्न मन आनंदी अंतःकरण यातूनच साध्य होते. मानसपूजे मध्ये आपण इच्छित दैवताची/सद्‌गुरुंची/संताची प्रतिमा डोळ्यासमोर आणतो. त्याची मनानेच बाह्य पूजेसारखीच पूजा करतो. तुकोबारायांनी मनाला माऊलींची उपमा दिली आहे. संकल्पानेच आपण मनोमन आपलेच गुरु व शिष्य

बनतो. याचे कारण स्थूल देहावरुन वेगळा सुक्ष्म देह व महाकारण देह.

तेच हे दैव साधतात. त्रिपुटी बनतात. म्हणून प्रत्येकास महाराज म्हणतात तुम्ही साधक असा, वाचक असा, श्रोते असा. मन हेच खरे दैवत आहे. तुमची प्रगति किंवा अधोगती तुमच्या मनाच्या अंकित आहे. किती व्यापक विचार व प्रबोधन केले. हा मानसशास्त्रीय दृष्टीकोन नाही का? संत तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञपण आहेत ना?

***



अभंग क्र. १०

पाप–पुण्याचे कोडे पुढील अभंगातून जगत्‌गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी कसे सोडवले ते पहा.

पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।
आणिक नाही जोडा दुजा यासी ।।
सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म ।
आणिक हे वर्म नाही दुजे ।।
गति ते चि मुखी नामाचे स्मरण ।
अधोगति जाण विन्मुखते ।।
संताच्या संग तो चि स्वर्गवास ।
नर्क तो उदास अनर्गळा ।।
तुका म्हणे उघडे आहे हित–ध्यान ।
जयाचे उचित करा तैसे ।।

दुसऱ्यावर उपकार करावा तोही निस्वार्थ भावनेने. तेच खरे पुण्य होय. दुसऱ्याला त्रास देणे पीडा करणे हे तर पाप. महात्मा गांधींनी संत तुकारामांच्या अभंगाचे वाचन मनन केल्याने सत्य हाच धर्म हे त्यांनी पण सांगितले.

जे खोटे आहे–असत्य आहे त्याचा त्याग करा. ते स्विकारू नका. तुम्हाला

सत्गति प्राप्त करुन घ्यायची असेल तर नामस्मरणाचा मार्ग स्विकारा. नामस्म रणांशी विन्मुखता ही अधोगतीच होय. स्वर्ग काय व नरक काय? संताच्या सहवासात तुम्हाला स्वर्गाची अनुभूती येईल. याबाबत उदासीन वृत्ती म्हणजे यातना. पहा तुमचे हित किंवा घात अभंगातील उचित गोष्टींवर अवलंबून आहे. समाजाचे, सर्व सामान्यांचे कल्याण कशात आहे. याबद्दल अतिशय सोप्या भाषेत अभंगातून उपदेश केला आहे.

***



अभंग क्र. ११

प्रेम हे कोणत्याही अपेक्षेशिवाय करावे. त्यासाठी आईचा व बाळाचा दाखला पुढील अभंगात दिला आहे.

लेकराचे हित । वाहे माऊलीचे चित्त ।।
ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभेविण प्रिती ।।
पोटी भार वाहे । त्याचे सर्वस्वही साहे ।।
तुका म्हणे माझे । तैसे तुम्हा संता ओझे ।।

संताना करुणा आहे म्हणून कळवळा आहे. बुद्ध विचारांचा प्रभाव संत तुकारामांच्या अभंगातून जाणवतो असे डॉ. अ. ह. साळुंके म्हणतात. आईचे अंतःकरण कायम बाळाकडेच असते. ती त्याच्याच हिताचा विचार करत असते. तिचे हे प्रेम कोणत्याही लाभाची अपेक्षा नसते म्हणून ही जातच वेगळी. तिला महाराजांनी 'कळवळ्याची' जात म्हटले आहे. आई जसा बाळाचा भार नऊ महिने वाहते पण तिला तो भार वाटत नाही. अगदी त्याप्रमाणे संत माझ्यावरील प्रेमाचा भार वाहत आहे असे महाराजांना सुचवायचे आहे.

संत दुबळे, फक्त देव, नाम स्मरण करतात असा सर्वसामान्यांचा गैरसमज आहे. यानंतर एका प्रसिद्ध अभंगाच्या दोनच ओवी पाहू ज्यात जगद्गुरु तुकोबारायांनी चांगलाच प्रहार केला आहे.

***

अभंग क्र. १२

मऊ मेणाहून आम्ही विष्णूदास ।
कठीण वज्रास भेदू ऐसे ।।
भले तरी देऊ कासेची लंगोटी ।
नाठाळांच्या पायी ठेऊ माथा ।।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड।
ज्यांचे पुरे

आमचा स्वामी हा पंढरीचा विठूराया. त्याचे आम्ही दास. त्यामुळे जे पिडीत आहेत त्याबद्दल आमचा करुणा भाव हृदयातून जागृत झाला । म्हणजे आम्ही अतिशय कोमल बनतो. परंतु कठीण प्रसंगात किंवा दुर्जनाशी वागतांना आम्ही कठीण प्रसंगातून बाहेर पडतो. वज्र म्हणजे कठीण शस्त्र, प्रसंगी त्याला ही भेदू म्हणजे आम्हाला दुबळे समजू नका. हरी-हरी करत असलो तरी सामर्थ्य आहे आमच्याकडे. आम्हाला कशाचाच मोह नाही. त्यामुळे आमचे सर्वस्व द्यायला आम्ही तयार असतो ते सज्ञनांसाठी. एवढेच नाही तर एखाद्यात परिवर्तन शक्य नसेल पण आम्हाला वाटते तो सुधारावा त्याचे कल्याण व्हावे तर आम्ही त्याची मनधरणी करु. विनवणी करु. त्याला नमस्कार सुद्धा करु.

संत तुकाराम महाराजांच्या भाबडेपणा बद्दल जे बोलतात त्यांना ह्या दोनच ओळीतून त्यांनी सडेतोड उत्तर दिले आहे.

***

अभंग क्र. १३

आलिया भोगासी असावे सादर ।
देवावरी भार घालूनिया ।।
मग तो कृपासिंधू निवारी सांकडे ।
येर ते बापुडे काय रंक ।।
भयाचिया पोटी दुःखाचिया राशी ।
शरण देवासी जाता भले ।।
तुका म्हणे नव्हे काय त्या करिता ।
चिंतावा तो आता विश्वंभर ।।

संत तुकाराम महाराजांचा हा अभंग जीवनाचे वास्तव दर्शवितो. तुम्ही निष्क्रिय असा असे नाही. संचित कर्माने भोग घडतातच असे गीता पण सांगते. अशावेळी सर्व कर्मे मला अर्पण कर असा उपदेश श्रीकृष्ण भगवान अर्जुनाला पण देतातच. म्हणून जे दुःख, प्रसंग येतात. त्याला सहन करा. व ईश्वराला ते सांगा. तो तुमचे दुःख निश्चित हलके करेन. भिती कशाला बाळगता? त्यामुळे तर आणखी दुःख होईल. त्यापेक्षा ईश्वराला शरण जा. त्यातून समाधान तरी मिळेल. परमेश्वराला आठवा माझ्या विठ्ठलाचे चिंतन करा. तो ह्यातून तुम्हाला मार्ग दाखवेल. किती सहज उपदेश केलाय.

***



अभंग क्र. १४

पुढील अभंग मी लहानपणी किर्तनात अनेकवेळा ऐकला आहे. यात नुसता भक्तिचा उपदेश नाही. शुद्ध अंतःकरण व संताचा सहवास कसा लाभेल याचे यथार्थ दर्शन आहे.

भावे गावे गीत । शुद्ध करुनिया चित्त ।।
तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।।
आणिकांचे कानी । गुण दोष मना ना आणि ।।
मस्तक ठेंगणा । करी संताच्या चरणा ।।
वेची ते वचन । जेणे राहे समाधान ।।
तुका म्हणे फार । थोडा तरी पर उपकार ।।

भाव हा भक्तिचा आत्मा आहे. परमेश्वराची आराधना प्रार्थना/गीत गातांना त्यात भाव असायला पाहिजे. भाव येण्यासाठी अंतःकरण/मन शुद्ध असायला हवे. तुम्हाला खरोखर देव हवा आहे का? हा अतिशय साधा उपाय आहे. श्रवण भक्तित सुद्धा व्याधीचे निराकरण होते हा अनुभव आहे मग ईश्वराचे भजन तर जास्त आनंद देणारच. आमची खेडेगावातील श्रद्धाळू भजन करतात. किती एकरूप होतात ते भजन म्हणतांना, त्यांनी काय संगीताचे शिक्षण घेतले का?

पण भाव हा अंर्तमनात असतो. गायन करताना संताच्या चरणी माथा टेकवा. लहान व्हा. अहंकार बाजूला ठेवा. त्यांचे उपदेशात्मक चार शब्द ऐका. त्याचे जीवनात आचरण करा. माऊलींनी सुद्धा ज्ञानेश्वरीत संताचे बोल खूप महत्त्वाचे आहेत हे सांगितले आहे.

शेवटी महाराज म्हणतात फार नका करु पण थोडा तर दुसऱ्यांवर उपकार करा. मदत करा. त्याचे सहाय्य करा. हे समाज प्रबोधन नाही, तर काय आहे?

***

अभंग क्र. १५

हा अभंग १२ चरणांचा असला तरी भावपूर्ण आहे. जाती/ वर्ण/उच्च/ नीच असा भेदभाव माझ्या विठ्ठलापाशी मूळीच नाही. सगळ्या संताची उदाहरणे महाराजांनी दिलीत म्हणून आपण या अभंगाने या लेखाला तूर्त स्वल्पविराम देऊ या. याचे शब्द इतके सोपे आहेत की त्याचे निरुपण करण्याची आवश्यकता भासत नाही. पाहू या.

उंचनिच काही नेणे भगवंत ।
तिष्ठे भाव भक्त देखोनिया ।।१।।

दासीपुत्र कण्या विदूराच्या भक्षी।
दैत्या घरी रक्षी प्रल्हादासी ।।२।।

चर्म रंगू लागे रोहिदासा संगे ।
कबिराचे मागी विणी शेले ।।३।।

सजन कसाया विकू लागे मास ।
मळा सावत्यास खूरपू लागे ।।४।।

नरहरी सोनारा घडो फुंकू लागे ।
चोखामेळ्या संगे ढोरे ओढी ।।५।।

नामयाची जनी सवे वेची शेणी ।
धर्मा घरी पाणी वाहे झाडी ।।६।।

नाम्यासवे जेवी नव्हे संकोचित ।
ज्ञानियांची भिंत अंगी ओढी ।।७।।

अर्जुनाची घोडी हाकी हा सारथी।
भक्षी प्रिति पोहे सुदाम्याचे ।।८।।

गौळीयांचे घरी गाईअंगे वळी ।
द्वारपाल बळीद्वारी झाला ।।९।।

यंकोबाचे ऋण फेडी ऋषिकेशी ।
अंबरिषाचे सोशी गर्भवास ।।१०।।

मिराबाई साठी घेतो विष प्याला ।
दामाजीचा झाला पाडेवार ।।११।।

घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची ।
हुंडी - त्या मेहत्याची अंगें भरी।।१२।।

पुंडलिकासाठी अझुनि तिष्ठत ।
तुका म्हणे मान धन्य त्याची ।।१३।।

अहो जो ईश्वरभक्त आहे. त्यासाठी तो धावून आला आहे. तिथे उंचनीच भाव नाहीत. दासीपुत्र विदूर, चर्मकार, रोहीदास, संत कबीर, सजन कसाई, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, अर्जुन, सुदामा, गौळी/बळीराजा यंकोबा, अंबरिघ, संत मिराबाई, दामाजी, गोरा कुंभार, नरसी मेहता व शेवटी भक्त पुंडलिकासाठी विटेवर उभा आहेच ना!

सर्वांची उदाहरणे देऊन संत तुकाराम म्हणतात, जात/पात/ वर्ण/भेद कुठे आहे इथे?

ईश्वराला भक्तिप्रिय आहे. खालच्या जातीचा/वर्णाचा म्हणून त्याने अंगिकार केलाच ना. लोकहो आपण ही ह्या जाती भेदाच्या भिंती उखडून टाकू या. आपल्यालाही ईश्वर भेटेल.

***

अभंग क्र. १६

चारी वेद जयासाठी । त्याचे नाम धरा कंठी ।।
न करी आणिक साधने । कष्टसी का वायाविण ।।
अठरा पुराणांचे पोटी । नामाविण नाही गोठी ।।
गीता जेणे उपदेशिली । ते हे विटेवरी माऊली ।।
तुका म्हणे सार धरी । वाचे हरिनाम उच्चारी ।।

हा अभंग हरिनाम घेण्यापेक्षा इतर साधनांचे कष्ट कशाला? हे सुचवतो असे मला वाटते. चारी वेदांचे व अठरा पुराणांचे सार म्हणजे हरीचे चिंतन. त्यातून आत्मस्वरूप दर्शन सामान्य जनांना ते म्हणतात अहो ज्या श्रीकृष्णाने गीतेचा उपदेश केला तो तर पांडूरंगरूपात विटेवर उभा आहे. थोडक्यात ह्या सगळ्याचा मतितार्थ एकच बाकीच्या साधनांपेक्षा फक्त हरिनामाचा जप करा.

माऊली पण हरिपाठात हेच सांगतात एक तत्त्व नाम दृढ धरी मना.

***

अभंग क्र. १७

जेणे वाढे अपकिर्ति । सर्वथा ते वर्जावे ।।
सत्य रुचे भलेपण । वचन ते जगासी ।।
होऊजते शूर त्यागे । वाऊगे ते सारावे ।।
तुका म्हणे खोटे वर्म । निंद्यकर्म काळिमा ।।

ह्या अभंगात महाराजांनी सामान्य जनांना पुन्हा कसे वागावे हे सांगितले आहे. ज्या गोष्टींमुळे, कामामुळे तुमची अपकिर्ती होईल म्हणजे लोक निंदा करतील अशा गोष्टी टाळाव्यात. लोकांना खरे व रुचकर बोलणे पटते. सत्यं ब्रुयाति प्रियं ब्रुयति हे सुभाषित प्रसिद्ध आहे. सत्याचि कास धरा सत्य हाच खरा धर्म असे गांधीजी म्हणत. तुमचे शौर्य कशात आहेत तर प्रसंगी त्यागात आहे. श्रीकृष्णाने एकदा माघार घेतली त्याला रणछोड दास म्हटले. जे वाऊगे

म्हणजे अयोग्य आहे ते निषिद्ध कर्म समजून त्याचा त्याग करावा. गीतेमध्ये कर्माचा सिद्धांत सांगतांना निषिद्ध कर्माचा त्याग करावा हे सांगितले आहे. शेवटी ते म्हणतात जे निंद्य आहे अशी कर्मे तुम्हाला काळिमा लावतील मग ती टाळणेच योग्य अभंगातून सहज आणि सोप्या भाषेत उपदेश हे महाराजांचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते.

आपण काय करावे व काय करु नये याचा साधा उपदेश त्यांनी केला आहे. आपले अपकिर्ती होईल असे जे वागणे आहे ते सोडून द्यावे. उदा. आपण भजन सेवा करतो देवळात नेहमी पूजा करतो. त्यात जर स्वार्थी मतलबी भ्रष्टाचारी वृत्ती ठेवली तर काय होईल. आज अनेक संत–महात्मे म्हणणारे जेल मध्ये आहेत. त्यांची अपकिर्ती झालीच ना! खोटे बोललेले लोकांना कळते उशीरा कळेल.

एवढेच. सत्यं ब्रूयात प्रियम ब्रुयात सत्य बोललेले सोकांना आवडते म्हणून वाईटाचा त्याग करुन आपण शुद्ध रहावे म्हणजे अंतःकरण शुद्ध व्हावे. खोटे वागलात, जे करु नये, वागू नये असे वागलात तर निंद्य कर्म केले तर तुम्हालाच काळिमा लागेल डाग लागेल. चोरी केली, भ्रष्टाचार केला, शिवीगाळ, मारामारी भांडण हे सर्व निंद्य आहे त्याने आपलेच नुकसान होते. रामाला वंदन करतात व रावणाला मात्र स्विकारत नाही कारण सितेचे अपहरण हे निंद्य कर्म, संत मिराबाईचा छळ केला त्यावेळी समाजाने मिराबाईचा स्विकार केला. छळ करणाऱ्यांचा नाही. संत चोखामेळाला नैवेद्याला सावली पडू नये म्हणून पुजाऱ्याने दूर लोटले तरीही शुद्ध भक्ति भावामुळे चोखामेळा संताचा मांदियाळीत जाऊन बसलाय. संत तुकाराम महाराज यांचेच उदाहरण घ्या. त्यांचा छळ करणाऱ्यांचा आपण आजही तिरस्कारच करतो. शुद्ध भाव असलेल्या जगतगुरु तुकाराम महाराजांना आजही आपण वंदनच करतो.

***

अभंग क्र. १८

करुनि जतन । कोणा कामा आले धन ।।
ऐसे जाणता जाणता । का रे होतोसी नेणता ।।
प्रिया पुत्र बंधू । नाही तुज याशी संबंधु ।।
तुका म्हणे एका । हरीविण नाही सखा ।

संसारात म्हणजे रोजच्या जीवनात आयुष्यात लोकहो तुम्ही खूप धन, संपत्ती कमावता. ती सांभाळून ठेवता. पूर्वी ती घरीच गाडग्या मडक्यात ठेवत नाहीतर पुरून ठेवत. आता बँकेत संचय करून ठेवतात किंवा जमीन, घर, सोने या द्वारे गुंतवणूक करतात.

खरे सांगा, तुम्ही जतन केलेले धन कोणाच्या कामाला येते? आयुष्य तर क्षणभंगूर आहे. कदाचित तुम्हांला त्याचा विनियोग करता येणार नाही. हे सर्व न समजल्यासारखे या बाबतीत का वागता?

प्रिया, पुत्र बंधू म्हणजे जवळचे आप्तेष्ट कुटूंब, नातेवाईक हे प्रसंगी खरेच उपयोगी पडतात का? मग त्यांचा संबंध ठेवून त्यांच्यासाठी एवढे कष्ट करून धन का जतन करता? वाल्हया कोळी ची गोष्ट सर्वांना माहित आहे. त्याच्या पापात कोणीच वाटा घ्यायला तयार नव्हते. आज सुध्दा केवळ संपत्तीसाठी मृत्यू पश्चात किती तरी भांडणे, कोर्टकचेऱ्या अगदी सुशिक्षित उच्चभ्रू लोकांमध्ये पण आढळलेच ना?

म्हणून या अभंगाचे चांगले मनन, चिंतन करावे हा उपदेश आज ही आपल्या सर्वांना तितकाच लागू पडतो.

शेवटी महाराज म्हणतात, तुमचा खरा सखा भवसागरात तरून जाण्यास कृपाळू माझा विठ्ठल आहे त्याला जवळ करा.

***

अभंग क्र. १९

सदा सर्वकाळ अंतरी कुटिल ।
तेणे गळा माळ घालू नये ।।
ज्यासी नाही दया क्षमा शांती ।
तेणे अंगी विभूति लावू नये ।।
जयासी न कळे भक्तिचे महिमान ।
तेणे ब्रम्हज्ञान बोलू नये ।।
ज्याचे मन नाही लागले हातासी ।
तेणे प्रपंचाशी टाकू नये ।।
तुका म्हणे ज्यासी नाही हरिभक्ति ।
तेणे भगवे हाती धरू नये ।।

संत तुकाराम महाराजांनी बाह्यरंग/ औडंबर देखावा किंवा भक्तिचा खोटा बडेजाव यांचा या अभंगातून चांगलाच समाचार घेतला आहे. आणि त्याच बरोबर संत, साधू, सज्ञन यांच्या अंगी कोणते सगुण असावेत हेही सांगितले आहे. सर्व सामान्य लोक परमार्थ करायला जातात पण मनावरच त्यांचा ताबा नाही तर मग त्यांनी आहे तो संसार/प्रपंचच करावा हे ही सुचविले आहे.

गळ्यात माळ घालणे हा बाह्य संस्कार नाही. तो अंतःकरणाची शुद्धता आहे.

माऊलींनी १२ व्या अध्यायात संताचे सगुण यांची सविस्तर चर्चा केली आहे. बाहेरची विभूती लावून काय उपयोग जर दया क्षमा व शांती हे गुणच तुमच्यात नसतील तर?

अभंग क्र. २०

साधकाची दशा उदास असावी ।
उपाधि नसावी अंर्तर्बाही ।।
लोलुपता काय निद्रेने जिणावे ।
भोजन करावे परमित ।।
एकांती लोकांती स्त्रियाशी वचन ।
प्राण गेल्या जाण बोलो नये
संग सज्जनाचा उच्चार नामाचा ।
घोष किर्तनाचा अहर्निशी ।।
तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे ।
तो चि ज्ञान लाहे गुरु कृपा

जो स्वतःला साधक म्हणवतो त्याने व्यवहारात कसे

बर्तन करावे याचा उपदेश संत तुकाराम महाराज या सोप्या अभंगाद्वारे करतात. त्याची वृत्ती नेहमी उदास म्हणजे निस्पृह असावी. कशामध्ये मन अडकवू नये. तसेच आपण काही करतो असा भाव ही नसावा. बडेजाव / लौकिकासाठी काही करु नये. अंतर्मनात तोच भाव असावा व बाह्य वर्तणूक तशीच असावी. निद्रेत सुख मानू नये. जास्त झोप नको किंवा जागरण ही नको. आहारपण आवश्यक तेवढा मोजका असावा. अर्जुनाच्या प्रश्नाला उत्तर देतांना भगवान सांगतात ज्याला योगाभ्यास करावयाचा आहे त्यांनी निद्रा व आहार या बाबत संयमित असावे. ते माऊलींनी ज्ञानेश्वरीत विशद केले आहे. सहावा अध्यायातील वरील अभंगाशी मिळते जुळते माऊलींच्या ह्या ओव्या पहा.

जो रसनेद्रियाचा अंकिला । कां निद्रेसी जीवे विकळा ।।
तो नाही एथ म्हणितला । अधिकारिया ।।
आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापे मविजे ।।

परस्त्री एकटी असतांना तिच्याशी बोलू नये किंवा खूप लोक असतांना

आपण एकटेच एखाद्या स्त्रीशी बोलणे टाळावे. सज्ञन लोकांच्या संगतीत राहावे. नामाचा उच्चार मुखी असावा. नवविधा भक्तित दुसरी भक्ति आहे किर्तन भक्ति याचा उल्लेख माऊलींनी ९व्या अध्यायात सविस्तर केला आहे. तुम्ही वरील साधना केली तर तुम्हाला सद्गुरु कृपा होऊन ज्ञानाची पहाट दिसेल. सम्यकज्ञान प्राप्त झाल्यावर गुरु आपोआप भेटेल असे माऊलींनी पण सांगितले आहे.

***

अभंग क्र. २१

आपुलिया बळे नाही मी बोलत ।
सखा भगवंत वाचा त्याची ।।
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी ।
शिकविता धनी वेगळाची ।।
काय म्या पामरे बोलावी उत्तरे ।
परि त्या विश्वंभरे बोलतसे ।।
तुका म्हणे याची कोण जाणे कळा ।
चालवी पांगळा पायाविण।।

संत तुकारामांनी अतिशय विनम्रतेने लोकांना हे सांगितले आहे की जे बोलतो/अभंग रचना करतो ती माझी नाहीच माझा सखा पांडूरंग त्याचीच ही वाचा जणू माझ्या मुखातून बाहेर पडतेय. त्यांनी साळुंकी पक्षी चे उदाहरण दिले आहे. तिचा स्वर अतिशय मंजूळ आहे. पण तिचा हा स्वर दिला कोणी? हे ते भगवंताचेच काम आहे. तुम्हीं काही विचारले तर. मी रचनेद्वारे उत्तर देतो ती त्या विठ्ठलाचीच आहेत बरे ! मी तर पामर आहे.

ह्या माझ्या विठ्ठलाची गोष्टच समजण्यापलीकडे आहे. पंगु लंघयार्त गिरी पांगळा सुद्धा प्रभुकृपेने चालतो.

***

अभंग क्र. २२

आम्हा घरी धन शब्दांची रत्ने । शब्दांची शस्त्रे यत्न करु ।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोका ।।
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देचि गौरव पुजा करु ।।

पहा महाराजांकडे कोणती धन दौलत आहे ती ! शब्दांची रत्ने आहेत आम्ही जी अभंग रचना करतो. किर्तनातून विठ्ठलाचे गुणगान करतो ते आमचे जडजवाहिर आहे. वेगळ्या शस्त्रांपेक्षा शब्दांची शस्त्रे करुन आम्ही भवसागर पाड पाडू. वेगळा यत्न न करता विठ्ठलाची स्तुति, प्रार्थना अभंगाद्वारे, किर्तनाद्वारे करुन तोच आमचा खरा यत्न होईल. आमचा हा जो देहातील ईश्वरी अंश आहे म्हणजेच जीव आहे त्याला शब्दानेच अर्पण सेवा करुन त्या जीवाचे पोषण करु. आयुष्य हे जीवाला शब्दाने समृद्ध करु. ही जी धनदौलत आहे. आमच्याकडे शब्दांची अभंगाची शब्दरुपी भक्तिची तिची मुक्त हस्ते लोकांना उधळण करु. आमचा देव ह्या आमच्या शब्दरुपी अभंग रचनेत व किर्तनातच आहे. विठ्ठलाची पुजा करायला आमच्याकडे दुसरे काय आहे. त्याच्याच कृपेने शब्दांनीच त्याचीच ही पुजा आम्ही आनंदाने करु. पहा आपल्या अभंग रचनेवर व किर्तन परंपरेवर किती अढळ श्रद्धा आहे महाराजांची.

***

अभंग क्र. २३

मज इंद्रियाचे लागले भांडण ।
म्हणती कान रसना धाली ।।
करिती तळमळ हस्त पादभाळ ।
नेत्रासी दुकाळ पडला थोर ।।
गुण गाय मुख ऐकती कान ।
आमचे कारण तैसे नव्हे ।।
आइकनी दर्शने फिटे सकळांचा पांग।
जेथे ज्याचा माग घेईल ते ।।
तुका म्हणे ऐसे करी नारायणा।
वासना ती यांची पुरवी आता ।।

मला हा अभंग खूप आवडतो एकदा किर्तनात निरूपणात हा अभंग १०/१२ वर्षांपूर्वी ऐकला असेल. बहुतेक ह.भ.प. श्री. कोकाटे यांच्या किर्तनात. बऱ्याच वेळा मी प्रवचनात ह्या अभंगाचा दाखला साक्षी देतो. भाव व विदेही वृत्ती किंवा अवस्था कशी उच्च स्तरावर जाऊ शकते है ह्या अभंगातून समजते.

संत तुकाराम असेच विदेही अवस्थेत साक्षी भावाने स्वतःच्याच इंद्रियाकडे पाहतांना त्यांचे विठ्ठलासाठी आपसांत जणू भांडण चाललेय असे त्यांना वाटून ते म्हणतात विठ्ठला पहा ना माझी इंद्रिये कशी भांडतात ? जीभेने तुझा उच्चार केला नामस्मरण केले तर कान तक्रार करतात. म्हणतात जीभ पवित्र झाली माझे काय? हात, पाय, कपाळ तर तुझ्या भेटीसाठी तळमळ करतात. पायांना वाटते पंढरीला जावे. हातांना वाटते

तुला नमस्कार करावा. कपाळाला वाटते तुझ्या चरणावर डोके ठेवावे. डोळे तर तुझी भेट घ्यायला तुला पहायला आतुर झालेत. ते तर म्हणतात दर्शनाचा दुष्काळ म्हणजेच दुकाळ पडलाय.

दुष्काळ शब्द दुकाळांचा अपभ्रंश होऊन रुढ होऊन बसलाय. खरे शब्द दुकाळ व सुकाळ आहेत. त्यामुळे लवकर सगळ्यांना दर्शनाची आस लागली आहे. एकदा त्यांना तुझे दर्शन झाले तर त्यांची जशी इच्छा असेल तसा वाटा ती उचलतील व मग भाग गेला शीण गेला अवघा झाला आनंद अशी ह्यांची म्हणजे इंद्रियाची अवस्था होईल. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात. हे पांडूरंगा, मायबापा माझ्या इंद्रियांची ही जी वेगवेगळी वासना आहे ती पुरव रे देवा !

ह्या अभंगाचे नीट चिंतन करा. मनन करा. आपल्या इंद्रियाची इच्छा ही आपल्या इच्छेपेक्षा वेगळी असू शकते ही भावना मनाला आनंदाच्या डोहात नेऊन जातो. इतकी उच्चतम अवस्था आपल्याला ईश्वराप्रती/ईष्ट देवतांप्रति /

सद्गुरु प्रति निर्माण होवो हीच ह्या अभंगाद्वारे आपणाकडे विनम्र प्रार्थना करतो.

***

अभंग क्र. २४

परिसे गे सुनबाई । नको वेचू दूध दही ।।
आवा चालली पंढरपुरा । वेशीपासून आली घरा ।।
ऐके गोष्टी सादर बाळे । करी जतन फुटके पाळे ।।
माझे हातीचा कलवडू । मज वाचून नको-फोडू ।।
उखळ मुसळ जाते । माझे मन गुंतले तेथे ।।
भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ।।
सून म्हणे बहुत निके । तुम्ही यात्रेसी जावे सुखे ।।
सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ।।
सुनमुखीचे वचन कानी । ऐकोनी सासू विवंची मनी ।।
सवतीचे चाळे खोटे । म्या जावेसे इला वाटे ।।
आता कासया यात्रे जाऊ । काय जाऊनि तेथे पाहू ।।
मुले लेकरे घर दार । माझे येथेचि पंढरपूर ।।
तुका म्हणे ऐसे जन । गोवियले मायेकरून ।।

हा अभंग जेव्हापासून मी किर्तनात ऐकला तेव्हा पासून महाराजांचे समाज निरिक्षण किती सूक्ष्म आहे याची प्रचिती आली. शब्द इतके सोपे आहेत की त्याचा अर्थ सहज समजेल. एक सासू जिला महाराजांनी आवा म्हटले ती पंढरपूरला निघाली. जातांना सूनेला तिने जे सांगितले ते आपण सर्वच अनुभवतो रोज. सांगून झाल्यावर सून म्हणते स्वहित पंढरपूरला जाण्यात साधा. इकडची घरची काळजी कशाला करता? झाले, सासूबाई ला वाटले मी जावे असे हिला वाटते म्हणजे मी गेल्यावर ही मात्र मजा करेल. तुकोबा रायांनी सवती म्हटले आहे. असेच असेल तर पंढरपूरला तरी कशाला जाऊ?

शेवटी या अभंगाचे सार महाराज आपल्या सर्वांना सांगतात. सगळे जन हे असे संसाराच्या मायजाळात अडकले म्हणूनच ती सासू वेशीपासूनच परत घरी आली. संसारात आपण किती अडकलो याचे प्रातिनिधीक स्वरूप म्हणजे हा अभंग.

हा अभंग डोळ्यांत अंजन घालते एवढे मात्र निश्चित.

***

अभंग क्र. २५

बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।।
अंगे झाडीन अंगण । त्याचे दासत्व करीन ।।
त्याचा होइन किंकर । उभा ठाकेन जोडोनिया कर ।।
तुका म्हणे देव त्याच्या चरणी माझा भाव ।।

बोले तैसा चाले याला महाराजांनी अनन्य साधारण महत्त्व दिले आहे. आपली बोली/भाषा, व कृत्ती यात साम्य असायला हवे. आपण जे बोलतो तसाच आपला एकूण व्यवहार असायला हवा. हा सम्यक अवस्था खूप अवघड आहे. अशा व्यक्तिंची पाऊली वंदांवीत. त्यांचे दास्यत्व ही करेन त्यांना नेहमी नमस्कार करेन जणू देवत्वाची खूण अशी अवस्था आहे असे महाराजांना वाटते. तुकाराम महाराजांचेच उदाहरण घेऊया. शिवाजी महाराजांनी त्यांना नजराणा पाठवला. त्यांनी त्याचा स्विकार केला नाही. आम्हाला माती व सोने सारखेच म्हणणारे तुकोंबाराय खरेच निस्पृह होते. हे या कृतीतून सिद्ध होते. अनेक सिद्ध पुरुष म्हणवणारे महात्मे लोकांना उपदेश मात्र करतात व स्वतःच्या चुकीच्या कृत्यांमुळे प्रसंगी तुरुंगवास भोगतात. महात्मा गांधीने सत्य व अहिंसा ही नुसती सांगितली नाही. आयुष्यभर या व्रताचे त्यांनी तंतोतत पालन केले.

ज्याला भक्तिचे महत्त्वच कळले नाही. खरी भक्ति काय? हेच समजले नाही तर कोरडे ब्रम्हज्ञान काय उपयोगाचे. संत सुरदास यांचा एक प्रसिद्ध दोहा आहे. कृष्ण गोकूळ सोडून जातो त्यावेळी आधी अक्रूर गोपींची समजूत काढायला जातो. परंतु अक्रूर गोपींची समजूत काढण्यास अयशस्वी होतों नंतर उद्धव येऊन कृष्ण देहाने जरी येथून गेला तरी तो आपल्याच ठिकाणी स्थित आहे.

असे ब्रम्हज्ञान उद्धव गोपींना सांगण्याचा प्रयत्न करतो पण गोपी त्याला म्हणतात उद्धवा अरे – आमच्या बांगड्या जर फुटल्या तर त्याच्या होणाऱ्या काचेच्या तुकड्यात सुद्धा तुला कृष्णच दिसेल. आणि तू आम्हाला ब्रम्हज्ञान शिकवतोस काय?

खऱ्या भक्तिशिवाय ब्रम्हज्ञानाची पोकळ पोपटपंची व्यर्थ आहे.

आता जे परमार्थ/भक्ति करायला जातात त्यांनी आधी स्वतःच्या म नावर

ताबा मिळवायला हवा. जैन धर्मात जितेंद्रिय असे संबोधले जाते. म्हणजे इंद्रियाला जिंका. हे जमत नसेल तर महाराज म्हणतात. तुम्ही प्रपंपच करा. भ्रामक परमार्थ करु नका. नुसते भगवे वस्त्र परीधान करुन काय उपयोग जर मनामध्ये भक्तिभावच जागृत झाला नसेल तर.

अशी माणसे देवच आहेत. त्यांना माझा सदैव नमस्कारच आहे. मी माझा मनोमन भाव त्यांच्या चरणावर अर्पण करित आहे. मनसा वाचा–काया याचा समतोल साधता आला तर मनुष्याला दैवी गुण प्राप्त होतात.

अभंग क्र. २६

पुण्य पर उपकार पाप ते परपीडा ।
आणिक नाही जोडा दुजा यासी ।।१।।
सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म ।
आणिक हे वर्म नाही दुजे ।।२।।
गति ते चि मुखी नामाचे स्मरण ।
अधोगति जाण विन्मुखता ।।३।।
संताच्या संग तोचि स्वर्गवास ।
नर्क तो उदास अनर्गळा ।।४।।
तुका म्हणे उघडे आहे हित ध्यान ।
जयाचे उचित करा तैसे ।।५।।

तुकाराम महाराजांचा हा ५ चरणाचा अभंग आहे. जीवनाचे व्यवहाराचे मर्म सांगणारे हितगुजात्मक उपदेशात्मक साधे सोपे व्यवहारी तत्त्वज्ञान याद्वारे विशद केले आहे. ५ चरणाचे विवेचन थोडेसे जास्त होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत पाप–पुण्याच्या आपल्या कल्पनेला महाराजांनी छेद दिला आहे. साधी सुटसुटीत व्याख्या दिली आहे. पर–उपकार म्हणजे दुसऱ्यांना मदत. कोणाला? जे दीन–दुबळे पिडित दलित, रंजले, गांजले त्यांना त्यांना आपल्या मदतीने सक्षम बनवा. हेच पुण्य गरिब विद्यार्थी आहे. हुशार आहे. त्याला शिक्षणाला मदत करा.

दुसऱ्याला पीडा म्हणजे त्रास देऊ नका. तुमच्या बोलण्याने वागणुकीने तो छळला जाता कामा नये. यापेक्षा वेगळे पाप–पुण्य नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर बाबा आमटे व त्यांच्या पूर्ण कुटूंबाचे देता येईल. महात्मा गांधी, विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापासून प्रेरणा घेऊन कुष्ठरोगी साठी आनंदवन उभे केले. आदिवासीं समाज साठी औषधोपचार सुरु केले. हे पर–उपकाराच ना!

आजकाल भावाभावांमध्ये संपत्ती, पैसा या मोहापोटी मारामारी खून कोर्ट कचेरी होतांना पाहतो वेदना होतात. या पर–पीडेतून काय मिळते? जाती जातीत भेद धर्माधर्मात वाद ही सुद्धा पर–पीडाच आहे.

धर्माची व्याख्या काय आहे? शास्त्र काय सांगते? त्यापेक्षा साधी व्याख्या महाराज देतात. सत्याने वागा. खरे बोला–खरा व्यवहार करा. लबाडी, कपटपणा हे सगळे असत्य आहे. अशी कर्म करुन आपण काय साध्य करणार आहोत? धर्माच्या नावाने शास्त्रज्ञांचा छळ युरोपात झाले आहेत. यात सत्यता ती काय? हा कोणता धर्म?

आचरणाला सत्यात आणा. तोच खरा धर्म. चुकीचे वागणे हा अधर्मच. आता गति शब्द वापरला. गती हा पारमार्थिक शब्द आहे. मोक्षाकडे वाटचाल

म्हणजे गती. त्याचे अनेक मार्ग आहेत. साधा सोपा मार्ग नामस्म रण. ते स्मरण मुरवावे. गोंदवलेकर महाराज म्हणतात. नामाची तळमळ लागली पाहिजे. सतत स्मरण हवे.

विस्मरण अजिबात नको. भुकेची तहानेची तळमळ तशीच नामाची तळमळ हवी.

नामस्मरणाला विस्मरतो म्हणजे पारमार्थिक अधोगती.

स्वर्गवास कशात आहे? संताच्या संगतीत त्यांच्या कृपेत त्यांच्या वचनात त्यांच्या बोलण्यात, त्यांच्या अभंगातून सहवास लाभतो. संताच्या संगतीबद्दल उदास किंवा अनिच्छा म्हणजे जणू नर्क असे महाराज म्हणतात. संत साहित्याचे वाचन मनन अभ्यास म्हणजे जणू, स्वर्गाचे द्वार खुले करण्यासारखे किती उदास विचार मांडला आहे.

महाराज म्हणतात ह्यावर लक्ष द्या. हे ध्यानात ठेवा. ह्यातच माणसाचे हित आहे. उचित ते आपण करावे अशी माझी अपेक्षा आहे. यातून महाराज हेच सुचवितात.

✻✻✻

अभंग क्र. २७

देही असोनिया देव । वृथा फिरतो निदैव ।।१।।
देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तिर्थग्रामी ।।२।।
नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरी ।।३।।
साखरेचे मूळ ऊस । तैसी देही देव दिसे ।।४।।
दुधी असता नवनीत । नेणे तयाचे मथित ।।५।।
तुका सांगे मूढजना । देही देव का पहाना ।।६।।

महाराजांचा हा देव शोधण्यासाठीचा हा साधा सोपा अभंग आहे. आपल्या या शरिरातच देव आहे. परंतु आपण मात्र इकडे तिकडे त्याला अन्य मार्गाने शोधत फिरतो.

आपल्या अंतर्यामीच देव आहे. मन अंर्तमुख केले की शांत होते. निर्भय–निर्मन अवस्था येते. तेच त्याचे मूळ स्वरुप आहे. आपण निष्कारण तिर्थयात्रा करत देव देव करत फिरतो. आज काल तर तिर्थयात्रेचे फॅड निघाले आहे. काही नेते मंडळी त्यांच्या स्वार्थासाठी तिर्थयात्रेचे आयोजन करतात. पंढरपूर–चारीधाम १२ ज्योर्तिलिंग अशा यात्रा घडवितात. आपण अशा यात्रेत फुकट असल्याने सहभागी पण होतो. निसर्गात मन रमवण्यापेक्षा अशा यात्रेत जणू देव भेटतो म्हणून हजेरी लावतो.

यासाठी दोन दृष्टांत देतात. मृगाच्या नाभीत कस्तुरी असते पण ते मात्र वनवन हिंडते. त्याचा त्याला ठावठिकाणा ही नसतो. ऊसात जशी मूलतः साखर असते तसाच आपल्या देहातच देव दिसू शकतो. होतय काय, त्याचा शोध कसा घ्यायचा याचे गुपित माहित नाही. भक्ति नामस्मरण हे त्याचे उपाय आहेत. दुधामध्ये लोणी आहे पण ते काढावे लागते. त्याची रित माहित पाहिजे.

तुकाराम महाराज म्हणतात हे वेड्या माणसा देहातील देवाला का पाहत नाही?

तुकाराम महाराजांनी देवाबद्दलची कल्पना व समाजातील प्रथा याबद्दल बोलके भाष्य या अभंगात केले आहे..

***

अभंग क्र. २८

नका दंतकथा येथे सांगो कोणी ।
कोरडे ते मानी बोल कोण?।।१।।
अनुभव येथे पाहिजे साचार ।
न चलती चार आम्हापुढे ।।२।।
वरी कोण मानी रसाळ बोलणे।
नाही झाली मने ओळखी तो।।३।।
निवडी वेगळे क्षीर आणि पाणी ।
राजहंस दोन्ही वेगळाली ।।४।।
तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे (विवेकी)
येरा गबाळ्याचे नाही काम ।।५।।

ऐकीव कथा काल्पनिक कथा आम्हाला सांगू नका. अनुभवाचे बोल सांगा, आम्ही तेच खरे मानू. अनुभव नसलेल्या गोष्टी आमच्यापुढे चालणार नाहीत. राजहंस जसा पाणी व दूध वेगळे करतो त्याप्रमाणे विवेकी (जातीचे) माणूस अनुभवाचे सांगणे व भ्रम दंतकथा याचे मूल्य जाणतो. खरे तेच स्विकारतो. गबाळ्याचे काम नोव्हे म्हणजे अविवेकी माणसाचे या जगात काहीच काम नाही म्हणजे उपयोग नाही.

व्यवहारात वागतांना, काही ऐकतांना आपण सारासार विचार करावा किती सहज जीवन जगण्याचा मंत्र महाराज या अभंगातून आपणा सर्वांना देतात.

विवेकाने वागण्याचा सल्ला या अभंगातून देतात. लोकांच्या बोलण्यावर किती विश्वास ठेवायचा हे ही आपल्या बुद्धी तारतम्याने ठरवावे. ऐकीव गोष्टीतून लोक विश्वास ठेवून वागतात. अनेक प्रथा चालीरिती समाजात वर्षानुवर्षे चालू आहेत. त्याची सत्यता, खरेपणा कोण तपासून पहाणार? देव कोपतो म्हणजे काय होते? किती तरी अनर्थ घडतात.

विज्ञानाची, स्वमनाची, अनुभवाची कसोटी लावा. 'गौतम बुद्ध' म्हणतात. मी सांगतो म्हणून स्विकारा असे नाही. त्यात तथ्य आहे का? कोणी ग्रहाला दोष देतो कोणी पत्रिकेवर विश्वास ठेवतो. कोणी शुभ अशुभ घटनेवर विसंबून रहातो.

शिवाजी महाराजांनी लढाईसाठी कधी मुहूर्त पाहिला नाही. अमावस्येला सुद्धा ते लढाईला बाहेर पडत. आदिवासी लोकांबरोबर बाबा आमटेंनी, ज्यावेळी दवाखाना औषधोपचार चालू केला त्यावेळी औषधाने रोग बरा होतो या विश्वासासाठी बाबांनी किती मेहनत घ्यावी लागली?

म्हणूनच ह्या साध्या उपदेशांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. अभंगाचे शेवटचे चरण सर्वांच्या परिचयाचे आहे. पण यावर लक्ष देऊन वागण्याची आवश्यकता आहे.

***

अभंग क्र. २९

हा गे आलो कोणी म्हणे बुडतिया ।
तेणे किती तया बळ चढे ।।१।।
तुम्ही तव भार घेतला सकळ ।
आश्वासिलो बाळ अभयकरे ।।२।।
भुकेलिया आस दाविता निर्धार ।
किती होय धीर समाधान ।।३।।
तुका म्हणे दिली चिंतामणी साठी ।
उचित कांचवटी दंडवत ।।४।।

किती साधा उपदेश केला आहे या अभंगातून. माणसाने दुसऱ्याला नेहमी आधार द्यावा. मदत करावी. जसे स्वामी समर्थ म्हणतात.

।। भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ।।

एखादा मनुष्य नदीत विहिरीत बुडतोय त्यावेळी आपण त्याला नुसते मी येतोय घाबरु नकोस म्हटले तरी त्याला त्यातून तरुन जाण्यासाठी बळ मिळते. लहान मुलांचा भार आपण घेतोच. त्याला अभय तर मिळतेच. शिवाय आश्वासित होतो. त्यामुळे बाळ निश्चित होते.

एखादा खूप भुकेला आहे. त्याला तुम्ही खायला देण्याचा निर्धार केला व आशा निर्माण केली तरी त्याला धीर तर येतोच. शिवाय समाधान मिळते ते

वेगळेच. शेवटच्या चरणात ते म्हणतात. एखादा चिंतामणी देतोय तर त्याला दंडवत घालणे उपकार कसे फेडू असे म्हणणे अपेक्षित असतांना त्याला काचेचा तुकडा परतफेड देऊन उचित कसे ठरेल? मनुष्याने नेहमी दुसऱ्याला धीर द्यावा. मदतीचा-सहकार्याचा हात पुढे करावे. महाराज एका अभंगात म्हणतात, बुडते हे जग न देखवे डोळा! असा कळकळा निर्माण व्हायला हवा. त्यानंतर प्रत्यक्ष सहकार्य करावे असहाय्य, पिडीत, दुबळे यांना आपंण आपल्या परिने नेहमीच मदत करावी ही समाजसेवा महाराजांना येथे अभिप्रेत आहे.

***

अभंग क्र. ३०

तुकाराम महाराजांनी समाजाच्या प्रत्येक घटकाला उपदेश केलाय त्यांनी प्रयत्नाला, कष्टाला अनन्य साधारण महत्त्व दिले आहे तसेच शेतकऱ्यांना सुद्धा उपदेशापर अभंग लिहिले आहेत. त्यातील एक अभंग पाहू–

बळ बुद्धी वेचुनिया शक्ती । उदक चालवावे युक्ति ।।१।।
नाही चळण तया अंगी । धावे लवणामागे वेगी ।।२।।
पाट मोट कळा । भरित पखाला सागळा ।।३।।
बीज ज्यासी घ्यावे । तुका म्हणे तैसे व्हावे ।।४।।

शेती मध्ये पाणी कसे द्यावे याबद्दल महाराजांचा हा अभंग आहे. मला वाटते शेतकऱ्यांबद्दल अनुभवातून अभंग रचना करणारे संत तुकाराम महाराज हे एकमेव संत असावेत. त्याबद्दल त्यांना प्रथम वंदन करतो.

स्वतःचे बळ, बुद्धी व शक्ती याचा वापर पाणी पिकांना देण्यासाठी वापरावे. कारण पाण्याला स्वतःला 'चळण' म्हणजे गती नाही. लावण म्हणजे उतार. जिथे उतार मिळेल तिथे ते धावत जाते हा साधा धर्म पाण्याचा आहे. म्हणून पाट उताराच्या दिशेने न्यावा. पाट तयार केला की मोटेने पाणी उपसायचे पूर्वी पखाला सागळा चामड्याचे पाणी भरण्यासाठी व पाटात सोडण्यासाठी वापरत असत म्हणून अतिशयत काळजीने पाटात पाणी सोडावे. शेतात समपातळीत पाणी सोडून पिकांपर्यंत सोडण्याचे कौशल्य शेतकऱ्याने आत्मसात करावे. पहा बी कोणते म्हणजे पीक कोणते ज्याप्रमाणे पाणी द्यावे.

प्रत्येक पिकाला सारखाच नियम लागू नाही. पिकाचे अंतर, आकार, वाफे पाटातील अंतर याचा अभ्यास शेतकऱ्यांना असतोच. त्याप्रमाणेच पाणी देण्याचे तंत्र आत्मसात करावे.

शेती संबंधी काळजी घेण्यासंबंधीचे अजूनही काही अभंग आहेत. पण आधी इतर विषयक अभंग पाहू या.

***

अभंग क्र. ३१

शुभ झाल्या दिशा अवघा चि काळ ।
अशुभ मंगळ मंगळाचे ।।१।।
हाताचिये दिपे दुरावली निशी।
न देखिजे कैसी आहे ती ।।२।।
सुख दुःखाहूनि नाही विपरित ।
देतील आघात हितफळे ।।३।।
तुका म्हणे आता आम्हासी हे भले।
अवघेचि जाले जीव जंत ।।४।।

आपण कार्य चालू करण्यास दिशा पहातो वास्तु पहातांना दिशेचा विचार केला जातो. तसेच मुहुर्त काढला जातो. हे आजही चालू आहे. म्हणून या अभंगाचे चिंतनात्मक महत्व अजूनही कायम आहे.

आम्हाला सगळ्याच दिशा आता शुभ झाल्यात. अशुभ अशी दिशा राहिलीच नाही. काळ म्हणजे दिवस, वेळ हे सुद्धा सगळेच शुभ वाटते आहे. ज्याला ज्याला तुम्ही अमंगळ, अपवित्र म्हणता ते आता आम्हाला मात्र मंगलमय वाटू लागले आहे.

ह्या त्यांच्या बोलण्यातील आशय आमलात आणावा असा आहे. दिशा काळ हे सगळे सापेक्ष परिमाणे आहेत. त्यासाठी शुभ-अशुभ असे कसे असू शकते. शिवाजी महाराजांनी लढाई करतांना कधीही मुहूर्त पाहिला नाही. अमावस्या असली तरी आरंभ केला आहे.

आपण हातात दिवा घेतला तर रात्र दूर गेली किती तर ती दिसतच नाही. दिवा हा विवेक–ज्ञान ह्या साठीचे रुपक आहे. ज्ञानाने अज्ञानाचा नाश करावा. विवेकाने अविवेकावर मात करावी.

सुख दुःख याचा विचार कशाला करता? दुःखातून सुख निर्माण होईल. आघात म्हणजे संकटे, कष्ट याने हितच साधेल. संकटाचे फळ हे हितकारकच होईल. संकटांना अनिष्ट व समजता इष्ट समजा.

शेवटी महाराज सुचवतात आम्हाला तर सगळेच भले वाटतात. प्रत्येक जीव प्राणीमात्र सारखेच म्हणजे मंगल पवित्र भासू लागले आहेत.

ज्यांना चांगले, समाजाच्या हिताचे दुःखीतांच्या सहाय्याचे काम करायचे त्यांनी दुःखे संकटे आली म्हणून निराश होवू नये. महाभारतात कुंतीने कृष्णाकडे संकटे येऊ दे म्हणजे तुझे स्मरण राहील म्हटले. सावित्रीबाईंना किती त्रास छळ सहन करावा लागला तरीही स्त्री शिक्षणाचा घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. महात्मा फुलेंच्या निधनानंतर सुद्धा त्या कार्य करतच राहिल्या. स्वतः तुकाराम महाराजांना तत्कालीन पंडितांनी त्रास दिला. अनेक संकटे आली म्हणून त्यांनी ना विठ्ठल भक्ति सोडली ना अभंगाद्वारे समाजोद्धाराचे कार्य.

लोकांनी विज्ञाननिष्ठ व्हावे व धीराने दुःखाला व संकटाला सामोरे जावे हा उपदेश या अभंगाद्वारे महाराज करत आहेत.

***

अभंग क्र. ३२

ढाल तलवारे गुंतले हे कर।
म्हणे मी जुझार कैसा झुंजो ।।१।।
पेटी पडदळे सिले टोप ओझे ।
हे तो जाले दुजे मरणमूळ ।।२।।
बैसविले मला येणे अश्वावरी ।
धावू पळू तरी कैसा आता ।।३।।
असोनि उपाय म्हणे हे अपाय ।
म्हणे हाय हाय काय करू ।।४।।
तुका म्हणे हा तो स्वये परब्रह्म ।
मूर्ख नेणे वर्म संतचरण ।।५।।

खरे तर हा अभंग आत्मज्ञान संपादनासाठी संताना शरण जावे त्याचे दास्यत्व करावे या साठी आहे पण त्यातील दाखले हे आपण व्यवहारात गोष्टींची सबब सांगत बसतो व प्रयत्न सोडून देतो म्हणून मुद्दाम यात घेतला आहे. गमतीशीर विनोद बुद्धीने उदाहरणे दिली आहेत. पहिले उदाहरण पहा. एखादा रणात सैनिक आहे तो स्वतःला झुंजार समजतो. पण म्हणतो माझे दोन्ही हात ढाल व तलवार यात गुंतलेत. आता तलवारीने वार कसा करु?

पोटावर तलवार घट्ट बांधली त्याला पट्टा आहे. त्यावर हत्यार ठेवलीत डोक्यावर शिरेटोप आहे. हे सगळे ओझे म्हणजे जणू मरण ओढवल्यासारखे वाटते.

दुसरे म्हणजे एवढे असून यावर कहर म्हणजे मी घोड्यावर बसलोय मग धावू कसा शत्रू मागे पळू कसा?

ही विवेकहीन कर्तव्यापासून दूर जाणाऱ्या माणसांची स्थिती आहे. वरील सर्व उदाहरणात अपाय नाहीत तर मदतीसाठी उपाय आहेत. तेच तुम्हाला अपाय वाटू लागले तर हाय हाय करत बसणार तर दुसरे तुम्हाला काय मदत करणार?

सबब व कारणे सांगून लोक कामे टाळतात. यासाठी हा अभंग डोळ्यात अंजन घालतो.

शेवटी चरणात म्हणतात माणूस तर स्वतःच परब्रह्म आहे. पण अज्ञानाने त्याला हे कळत नाही. हा वेडा माणूस या अज्ञानापासून ज्ञानी होण्याचे वर्म कसे समजावून घेत नाही. संतचरण धरावे त्यांचा संग धरावा त्यांचे दास्य करावे ते सांगतील तोच उपदेश मानावा व आपले परब्रह्म स्वरुप ओळखण्यास यामार्गाचे सहाय्य घ्यावे.

***

अभंग क्र. ३३

चाकरीवाचून । खाणे अनुचित वेतन ।।१।।
धणी काढोनिया निजा। करील हे कामाची पूजा ।।२।।
उचिता वेगळे । अमिळासे तोंड काळे ।।३।।
सांगे तरी तुका । पाहा लाज नाही लोका ।।४।।

पहा समाजातील ऐतखाऊ, कामचुकार व बिना काम मोबदला पैसा मिळावेत अशांसाठी डोळ्यात अंजन, घालणारा हा अभंग आहे. समाजातील या दुष्प्रवृत्तीचा महाराज निषेध करतात.

आपण पूर्ण काम केलेले नाही पण त्या मोबदल्यात पगार मात्र पूर्ण पाहिजे. ज्याच्याकडे आपण काम करतो तो धनी, काम झाल्यावर आपल्या कामाचा मोबदला रोजगार पगार, मोबदला देणार आहेच ना! तीच पूजा असे महाराज म्हणतात. परंतु या पद्धतीपेक्षा वेगळे वागणे म्हणजे पूर्ण वेळ काम तर करायचे नाही पण पगार वेतन रोजगार या गोष्टी पूर्ण पाहिजे असे म्हणणाऱ्या लोकांचे म्हणजे अभिलाषी लोकांचे तोंड काळे होवो. अशा लोकांना लाज कशी वाटत नाही.

यावर खूप भाष्य करण्यासारखे आहे. रोजगार हमीचा कायदा १९७२ च्या दरम्यान महाराष्ट्रात दुष्काळात आला होता. लोकांना राष्ट्रीय सामाजिक प्रकल्पावर काम देऊन त्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन दिली जात असे. पण आज काय चित्र आहे. सरकारच ऐतखाऊपणा जोपासते असे चित्र आहे.

हे विघातक विदीर्ण चित्र आहे. त्यामुळे लोक आळशी होतात. मोठ-मोठ्या पगारावर प्रतिष्ठित कंपनीत काम करणारे सुद्धा आपल्याला मिळणाऱ्या मोबदल्याप्रमाणे आपण योगदान देतो की नाही याचा विचार करतात का? कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कमवा व शिका ही स्वावलंबावर आधारित योजना राबवली होती.

या अभंगाचे महत्त्व आजही तितकेच आहे. व सर्वांनी अंतर्मुख होऊन याचा विचार करावा म्हणून ह्या अभंगाची निवड जाणीवपूर्वक केली आहे.

आज काल तर काही न करता पैसे घ्या अशा अनेक सरकारी योजना/ घोषित सरसकट पाहायला मिळतात.

***

अभंग क्र. ३४

आपल्या संपूर्ण जीवनात सुखे येतात दुःखेही येतात. त्याचा स्विकार करण्याची वृत्ती अंगी जोपासावी म्हणून खालचा अभंग घेतला आहे.

कै वहावे जीवन । कै पलंगी शयन ।।१।।
जैसी जैसी वेळ पडे । तैसे तैसे होणे घडे ।।२।।
के भौज्य नानापरी के कोरडी भाकरी ।।३।।
के बसावे वहनी । कै पायी अन्हपाणी ।।४।।
कै उत्तम प्रावणे । कै वसने ती जीर्णे ।।५।।
कै सकळ संपत्ती । कै भोगणे विपत्ती ।।६।।
कै सज्जनाशी संग । कै दुर्जनाशी योग ।।७।।
तुका म्हणे जाण । सुख दुःख ते समान ।।८।।

हा अभंग आश्वासक आहे. धीर देणारा आहे. काही लोक पाणी वाहतात म्हणजे कष्ट करतात. काही नुसते पलंगावर झोपून आयुष्य काढतात. त्यामुळे अशी वेळ असेल तसे घडेल आपण आपले धैर्य सोडू नये. सावित्रीबाई फुले एका पातळावर राहायच्या. तिच साडी रात्री धुवून सकाळी घालायच्या. गाडगे बाबांनी संसारिक यातना भोगल्या पण अज्ञानी समाजाला शहाणे करण्याचा प्रयत्न सोडला नाही. काहींना पंचपक्काने खायला मिळतात. काहींना भाकरी

बरोबर भाजी पण मिळत नाही. आपले माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी असे शालेय जीवन उपभोगले आहे.

काही लोकांना अतिशय किमती गाड्यांमधून जायला मिळते तर काहींना अनवाणी प्रवास करावा लागतो.

काहींना उत्तम कपडे उंची पोशाख घालायला मिळतात तर काहींना जुने फाटके कपडे घालावे लागतात. काही जण जन्मजात श्रीमंत गर्भ श्रीमंत तर काहींना विपत्ती भोगावी लागते. काहींना सज्ज्ञनाचा संग व आपोआप मिळतो तर काहींचा योगच असा की दुर्जनांशी संगत मिळते.

सुख दुःख हे समसमान असते. हे महाराजांना येथे आवर्जून सांगावयाचे आहे. सुखात आनंदी होऊन जाऊ नका दुःखात निराश होऊ नका. हेच यातून सुचवायचे असेल.

अनेक थोर पुरुष, शास्त्रज्ञ, यांनी हाल अपेक्षा सहन केल्यात. भूतपूर्व राष्ट्रपति अब्दूल कलाम यांना शिक्षणासाठी बहिणीने दागिने विकले होते. संकटाचे व गरिबीचे भांडवल करु नका. यावर मात करण्याचे कसब आत्मसात करा.

***

अभंग क्र. ३५

तुकाराम महाराज भक्तिवर विठ्ठल नामावर जितका जोर देतात. तितकाच अभ्यास, सराव प्रयत्न यावर ही देतात. पुढचा एक प्रयत्न वादा वरचा अभंग पहा.

ओले मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासाची सांग कार्यासिद्धी ||१||
नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोच वरि ||२||
दोरे चिरा कापे कांचणी । अभ्यासी सेवनी विष पडे ||३||
तुका म्हणे कैचा बैसण्याची ठाव । जठरी बाळा वाघ एका एकी

प्रयत्न केले तर अवघड काहीच नाही. उदाहरणे देऊन सप्रमाण त्यांनी दाखवून दिले आहे. झाडाची मूळे ओली असतांना खडकातून पण जाऊन मार्ग काढतात. अभ्यास म्हणजे प्रयत्न केला तर कार्य सिद्धी होतेच हे ते आपल्याला निरक्षून सांगतात. तुम्ही जोपर्यंत कार्याला सुरुवात करित नाही. तोपर्यंतच ते अवघडत वाटते. संगीतकार गायक सकाळी उठून तास न तास रियाज करतोच ना. एकादा कठीण दोरखंड कापायचा तर टोकदार दोन दगड घ्यावेत त्याचीच काचणी तयार होते व दोर कापला जातो.

सराव केला तर विषाचे सेवनही करता येते. आपले या जगातील स्थान आपणच निर्माण करावे लागते. जठरामध्ये गर्भ वाढतांना आईच्या उदरात तो जागा निर्माण करतोच ना !

मला वाचकांना दोन उदाहरणे मुद्दाम द्यायची आहेत. सुधा मुर्तीने जे आर. डी. टाटांना पत्र लिहिले नसते तर महिला इंजिनिअर टाटा कंपनीत कशी कामाला लागली असती?

कल्पना चावला लहानपणापासून स्वप्न बाळगत होती. अवकाशात झेप घेण्याचे उद्दीष्ट तिने साध्य केलेच ना! महाराजासारखे संत ज्यावेळी असा सर्वांना हिताचा प्रयत्न वादाचा उपदेश करतात त्यावेळी मनात येते या जगद्गुरु संताच्या विचारांचे खऱ्या अर्थाने आपण पाईक केव्हा होणार?

***

अभंग क्र. ३६

आंधिळ्यासि जन अवघेचि आंधळे ।
आपणासि डोळे दृष्टी नाही ।।१।।
रोग्या विषतुल लागे हे मिष्टान्न ।
तोंडासी कारण चवी नाही ।।२।।
तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण ।
तया त्रिभुवन अवघे खोटे ।।३।।

आपण दुसऱ्याला खोटे का ठरवतो? आपण तरी कोठे शुद्ध किंवा खरे असतो? दोन उदाहरणे दिली आहेत. आंधळा असतो त्याला दृष्टीज्ञान नसल्याने (शहाणे लोकपण इतर त्याच्या दृष्टीने आंधळेच. आपण आजारी असलो किंवा खूप ज्वर-ताप अंगात असला तर तोंडाला चव नसते. गोड पक्वाने दिली तरी त्याला ती गोड वाटण्याऐवजी विषवत वाटते. कबीरांचा एक प्रसिद्ध दोहा आहे.

बुरा जो देखन मै चला, बुरा न मिलिया कोय ।
जो दिल खोजा अपना. मुझसे बुरा न कोय ।।

आपण शुद्ध नसलो अतःकरण निर्मळ नसेल तर सारे जग आपल्याला खोटे वाटते. म्हणजे व्यवहारात चांगली माणसे असतांना आपल्याला ती वाईट वाटतात किंवा वाईट भासतात. त्यामुळे एकतर तुम्ही दुसऱ्याबद्दल मतप्रदर्शन करतांना विचार करा. किंवा स्वतः शुद्ध पवित्र, मंगळ, खरे, चांगले वागा नाहीतर तुमच्या खोट्या वागण्याचा परिणाम तुम्हाला इतर लोकही खोटेच वाटू शकतील. मला वाटते महाराजांचा हा अभंग दोन्ही बाजूंनी विचार करण्यासारखा आहे. एक आपण स्वतः शुद्ध होण्याचा प्रयत्न करावा दुसरे आपण शुद्ध नसाल तर दुसऱ्यांना विनाकारण खोटे ठरवण्याचा प्रयत्न करु नये.

***

अभंग क्र. ३७

नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ।।१।।
हेचि शुरत्वाचे अंग । हरी आणिला श्रीरंग ।।२।।
अवघा झाला पण । लवणा सकळां कारण ।।३।।
तुका म्हणे पाणी । पाताळ ते परी खणी ।।४।।

सर्व प्राणिमात्रांबद्दल नम्रता असावी. आपला स्वभाव नम्र असेल दुसऱ्याला मोठेपणा देण्याचा असेल तर तुम्ही त्या अभंगाला म्हणजे इश्वराला अंकित केले असे समजा हे

एक प्रकारे पराक्रमाचे शूरत्वाचे लक्षण आहे. श्रीरंगाला म्हणजेच परमेश्वराला हरविण्याचे सामर्थ्य यात आहे. एखादी पैज (पण) जिंकल्यासारखे हे आहे. लवणं, नम्र होणे त्यामुळे तुम्हाला मात्र पुर्णत्व लागते. नम्रता म्हणजे दुबळेपणा समजू नका. त्यासाठी महाराजांनी पाण्याचे उदाहरण दिले. पाण्याचा स्वभाव उताराकडे जाण्याकडे असतो ही नम्रपणा आहे. सामर्थ्य असते की पाताळाला म्हणजे खडकाला फोडून ते पुढे जाऊ शकते.

किती साध्या विषयात उदबोधक मार्गदर्शन अभंगाद्वारे संत तुकाराम महाराज यांनी केले. हे पाहिले की मती गुंग होते.

आपण भक्ति, देव, नाम या मधूनच संत तुकाराम महाराजांना पाहतो पण त्यांच्या विषयाची व्यापकता लक्षात अजूनही आपल्याला आली की नाही याबद्दल मी तरी साशंकच आहे.

ईश्वराची प्राप्ती ही नम्रतेने सुद्धा होऊ शकते हे ही त्यांनी जाता जाता सुचविले आहे.

***

अभंग क्र. ३८

क्षमा शस्त्र जया नराचिया हाती ।
दुष्ट तयाप्रति काय करी ? ।।१।।
तृण नाही तेथे पडिला दावाग्नि ।
जाय तो विझोनि आपसया ।।२।।
तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित ।
धरा अखंडित सुखरुप ।।३।।

संत तुकाराम महाराजांनी या अभंगात क्षमा काय करु शकते हे सांगितले आहे. ज्यांच्याजवळ हे क्षमा शस्त्र आहे त्याला दुष्ट तरी काय करू शकेल? गौतम बुद्ध व दरोडेखोर अंगुलीमालाची कथा प्रसिद्ध आहे. समोर अंगुलीम ालासारखा क्रूर हत्यारी खूनी अंगुलीमाल आहे म्हणून त्या रस्त्याने जाऊ नये म्हणून शिष्यांनी आग्रह धरला पण बुद्ध तर करुणासागर होते त्यांनी त्याच रस्त्याने जाण्याचा निर्णय घेतला. अंगुलीमालाला त्यांनी

आपल्या कृपेने, क्षमेने, करुणेने आपलेसे केले. तो १०० वा खून करण्याची वाट पहात होता पण गौतम बुद्धांना शरण आला ही क्षमेची ताकद आहे.

त्यांनी साधे उदाहरण दिले आहे. जिथे अजिबात गवत नाही. तिथे अग्नी आला तर काय होईल? काही वेळाने विझून जाईलच ना!

म्हणून महाराज सुचवतात. क्षमाशील वृत्ती अंगी बाणा त्यातच सर्वांचे हित आहे. अखंडित सुखी राहण्याचा तो एक साधा सोपा मंत्र आहे. उपाय आहे.

स्वतः तुकाराम महाराजांचा अनेक वेळा छळ झाला. पण त्यांनी सर्वांनाच माफ केले. कोणाबद्दल राग धरला नाही. संत एकनाथ महाराजांची क्षमाशील वृत्ती सर्वांच्या परिचयाची आहे. त्यांना 'शांतीब्रह्म' उपाधी लावतात. संत मुक्ताबाई त्यांच्या थोरल्या भावाला म्हणजे माऊलींच्या 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' म्हणतात. शिव्या देणाऱ्याला सुद्धा गौतम बुद्धांनी प्रतिशब्द केला नाही. ज्यांनी आपणाला सुळावर चढवले त्यांना माफ कर ईश्वरा असे येशू ख्रिस्त म्हणाले. क्षमा केली नाही. प्रतिकार केला नाही तर तुम्ही दुःखी होण्याची शक्यता आहे.

महाराजांनी अभंगातून साध्या गोष्टींचा उपदेश केला हे पाहून किती उतराई व्हावे हा भाव मनात येतो.

***

अभंग क्र. ३९

वळिते जे गाई । त्यासि फार लागे काई ? ।।१।।
निवे भावाच्या उत्तरी । भलते एके धणी करी ।।२।।
न लगती प्रकार । काही मानाचा आदर ।।३।।
सांडी थोरपणा । तुका म्हणे सवे दीना ।।४।।

या अभंगात थोरपणा सांडावा आपण कोणी मोठे महान, पद, सत्ता घेतलेले हे विसरावे हे सांगतांना संत तुकाराम महाराज यांनी श्रीकृष्णाचे बालपणाचे उदाहरण दिले आहे. त्यांनी सवंगड्याबरोबर गोपाळांबरोबर गाई वळल्याच ना! त्यांच्या सवंगड्यानी साधे

शब्द मैत्रीचे उच्चारले तरी हा देव आनंदी व्हायचा. त्याला मान, आदर सत्कार कौतुक हे प्रकार लागलेच नाही. दिन दुबळ्यांबरोबर त्यांच्या सारखे होऊन मिसळा. संत्र गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज ह्यांनी सुद्धा घरासाठी कुटुंबासाठी गाई-म्हशी वळल्यातच ना! बाबा आमटे त्यांच्या पत्नी, दोघेही डॉक्टर पण आदिवासींची सेवा करतांना त्यांच्या भाषेत त्यांच्या चालिरिती पाहून तिथे कष्टमय जीवन जगत सेवा केली ना!

गरिबांच्या वस्तीत त्यांना मदत करतांना तुम्ही सुटाबुटात जाऊन अंतर ठेवून चालेल का? महाराष्ट्रात दिन दुबळ्यांसाठी आज समाज दानशूर व्यक्ति पुढे येतात व मनोभावे सेवा करतात. कुठेही अभिमान नाही. पुनावाला ग्रूप याचे बोलके उदाहरण आहे. मला म्हणूनच तुकाराम महाराजांच्या समग्र विषयांवरचे अभंग पाहून वाटते असा तळमळीचा संत होणे दुर्मिळच !

***

अभंग क्र. ४०

शांतीपरते नाही सुख । येर अवघे ची दुःख ।।१।।
म्हणऊनी शांती धरा । उतराल पैल तीरा ।।२।।
सवळलियो काम क्रोध । अंगी भरती आधि व्याधी ।।३।।
तुका म्हणे त्रिविध ताप । जाती मग आपोआप ।।४।।

कोणत्याही प्रसंगी विशेषतः आपणा मनाविरुद्ध घटना झाली घडली तरी शांत रहावे. त्यातच सुख आहे. नाहीतर उद्वेग संताप राग म्हणजे दुःख ठरलेले आहे. 'शांती'चा अंगिकार करा व मग दुःखातून संकटातून पार पडाल म्हणजे पैलतीरावर पोहचाल. उलटपक्षी जर मनात काम क्रोध असला तर त्यामुळे तुम्हाला रोग/व्याधी जडल्याच म्हणून समजा.

त्रिविध ताप म्हणजे, आधिदैविक, आध्यात्मिक व आधिभौतिक हा तीनही तापाचे निराकरण करण्यास शांती हाच उपाय आहे.

माऊलींनी पण काम क्रोध हे शत्रु आहेत. असे म्हटले आहे. राग आला तर रक्ताचे अभिसरण तीव्र होते. मेंदू तील भावना उद्दिपित होतात. आपल्या हातून प्रमाद घडू शकतो. खून/मारामारी/क्रोधातूनच उद्भवतात. नंतर पश्चाताप होतो. त्यापेक्षा डोके शांत ठेवावे असा साधा उपदेश आपल्यासर्वांना या अभंगातून महाराज करीत आहेत.

***

अभंग क्र. ४१

न लगे चंदना सांगावा परिमळ ।
वनस्पति मेळ हाकारूनी ।।१।।
अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी ।
धरिता ही परी आवरेना ।।२।।
सूर्य नाही जागे करीत या जना ।
प्रकाश किरणा कर म्हून ।।३।।
तुका म्हणे मेघ नाचती मयुरे ।
लपविण खरे येत नाही ।।४।।

आपण जी सत्कृत्ये करतो त्याची जाहिरात बाजी करण्याची गरजच नसते पण आज काल लोक हे करतात. तुकाराम महाराजांनी चंदनाचे उदाहरण दिले आहे. चंदन काही इतर वनस्पतींना दिंडोरा पिटवून सांगत नाही. माझ्याकडे सुगंध आहे. त्याचा सुगंध दरवळतोच.

आपल्या मनाचा अंतरीचा स्वभाव आपल्या बाह्य कृतीतून दिसणारच. तुम्ही मायाळू-कनवाळू असाल तर दुसऱ्यांना मदत करण्याची प्रवृत्ती लपणार नाही. सावित्रीबाई फुलेंना तळमळ होती स्त्रीने शिकावे. ती त्यांच्या कृतीतून जगाने पाहिली. संकटाचा सामना केला. कष्ट-त्रास, अपमान सहन केला पण म्हणून स्वभाव सोडला नाही.

महाराजांनी सूर्याचे उदाहरण दिले आहे. सूर्यांची किरणे लोकांना जागे व्हा म्हणून ओरडून सांगत नाहीत. लोक सूर्यकिरण पाहून आपोआप जागे होतात.

आकाशात ढग दिसले की मोराला नृत्य करायला सांगावे लागत नाही. सद्गुण लपविता येत नाही. लोक सत्कार्याची नोंद घेतातच. अनुभव आला की मग मदत द्या म्हणून मागे लागतात. बाबा आमटेंनी रोग्यांना औषधामुळे बरे केले. आदीवासी गरीब जनतेला समजल्यावर दवाखाना आपोआप सुरु झाला. दवंडी पिटवावी लागली नाही. गाडगेबाबा लोकांना त्यांच्या हिताचा उपदेश करत असत. त्यांच्यात मिसळून त्यांच्याच सवयीचा दाखला देऊन अंधश्रद्धेपासून व्यसनापासून दूर व्हा सांगत. लोक, किर्तनाला गर्दी करु लागले. अत्रे सारख्यांनी वृत्तपत्रातून गाडगेबाबांची प्रशंसा केली.

थोडक्यात सद्गुणांची जोपासना करा. (सत्कर्मे करा. तुम्हाला साथ मिळेलच त्यासाठी प्रसिद्धीचा स्टंटबाजीचा हव्यास सोडा हे सहजपणे महाराजांनी या अभंगाद्वारे सुचवले आहे.

***

अभंग क्र. ४२

नसावे ओशाळ । मन मानिती सकळ ।।१।।
जाय तेथे पावे मान । चाले बोलिले वचन ।।२।।
राहो नेदी बाकी । दान ज्याचे त्यासी टाकी ।।३।।
होवा वाटे जना । तुका म्हणे साठी गुणा ।।४।।

तुकाराम महाराजांनी समाजाचे त्यांच्या व्यवहाराचे सूक्ष्म निरिक्षण केले होते. व्यवहारात कसे वागावे या करताचा हा अभंग अतिशय सोपा पण मार्मिक आहे.

स्वाभिमानाने जगा. ताठ मानेने जगा. कोणाचेही मिंधे होऊ नका. मग लोक तुम्हाला आपोआप किंमत देतील. तुमचा व्यवहार व बोलणे यात अंतर नको. मुहमे राम और बगलमे छुरी असे नको. मग तुम्ही जाल तिथे लोक तुमचे कौतुक केल्याशिवाय राहणार नाहीत. आपले भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना विद्यार्थी वर्ग/शास्त्रज्ञ खूपच सन्मान देत. शेवटचा श्वास सुद्धा त्यांनी आपले उपदेशात्मक भाषण चालू असतांना सोडला.

कोणाचेही पैसे घेतले असतील तर ते परत करा. त्याचे देऊन टाका. मग लोकांना तुमचा हेवा वाटल्याशिवाय राहणार नाही.

हे सद्गुण जोपासा हे याद्वारे महाराज विशद करित आहे.

***

अभंग क्र. ४३

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे।
पक्षी ही सुस्वरे आळविती ।।१।।
येणे सुखे रुचे एकन्ताचा वास ।
नाही गुण दोष अंगा येत ।।२।।
आकाश मंडप पृथ्वी आसन ।
रमे तिथे मन क्रिडा करू ।।३।।
कंथा कुमंडलु देह उपचारा।
जाणवितो वारा अवसरू ।।४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार।
करोनि प्रकार सेवू रूची ।।५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद।
आपुलाचि वाद आपणासी ।।६।।

आजच्या परिस्थितीत तुकाराम महाराजांचा अभंग खूपच महत्त्वाचा वाटतो. आजकाल मोबाईल/सोशल मिडियाच्या विळख्यात आपण अडकलोय. मग निसर्गाच्या सानिध्यात महाराजांनी त्यांनी अनुभवलेल्या आनंदाचे वर्णन यात

केले आहे. वनामध्ये आम्ही राहिलो की ही झाडेच आमचे नातेवाईक बनतात. सोयरे म्हणजे सखे, संबंधी पक्षांचा सुमधुर किलबिलाट हा सुस्वर वाटतो. पण या एकान्तवासात सुखच सुख शरीराला या वनचरातील वास्तव्याच्या संग लावून दोष नाही वाटत आकाश अनंत आहे त्यात आम्ही मोकळा श्वास घेतो. जमिनीवर पहुडलो काय क्रिडा केली काय मन कसे रमून जाते नाही? ओंजळभर पाणी प्यावे, वाऱ्याची झुळूक यावी आनंदाने नाचू बागडू, भोजनाला काय आहे हरिकथा, त्या कथेचा विस्तार करता करता रुचकर आस्वाद आम्ही घेतो. हे सगळे आत्मानंदी अनुभव निसर्गाच्या सानिध्यात आले की, मनच मनाशी बोलू लागते द्वैतातून ते अदैतात जाते असा हा आनंद आपण निसर्गात जाऊन अनुभवयाला हवा. कृत्रिम जगात आभासी वास्तवात जगण्यापेक्षा निसर्गाशी जवळीक करावी हा संदेश महाराज यातून देतात.

***

अभंग क्र. ४४

करावी ने पूजा मने चि उत्तम ।
लौकिकाचे काम काय असे ।।१।।
कळावे तयासी कळे अंतरीचे ।
कारण ते साचे साचअंगी ।।२।।
अतिशया अंती लाभ आणि घात ।
फळ देते बीजा ऐसे ।।३।।
तुका म्हणे जेणे राहे समाधान ।
ऐसे ते भजन पार पावी ।।४।।

मानस पूजे बद्दलचा हा साधा सोपा अभंग आहे. आपण मंदिरात जाऊन पूजा करतो. किती प्रकारे पूजा करतो. वस्त्र अलंकार–फूले हार–सुवासिक द्रव्ये, दागिने किती किती सजवतो. ही सगळी लौकिक पूजा खर तर गीतेत सांगितले.

पत्रं पुष्पं फलतोयं.

मला साधे फल–फूल पण चालेल. भाव महत्त्वाचा आहे. यात महाराज म्हणतात. मनानेच पूजा करावी, मानसपूजेचे एक शास्त्र आहे. आपल्या इष्ट देवतेची, सद्गुरुची पूजा आपण एकाग्र चित्त करुन मानस पूजा करु शकतो. मानसपूजेंमध्ये स्थूल देह कारण देह व महाकारण देह हे मदतीला येतात. पूजेचे साहित्य विधी हे दोन देह पार पाडतात. म्हणून महाराज म्हणतात हे जर करता आले तर उत्तमच. मग लौकिक पूजेचे कामच राहणार नाही.

शेवटी मनाला काय चाललय ते कळतच अंतरंगातील भाव खरे प्रकट होतातच. कशाचाही अतिरेक केला तर कदाचित लाभ होईल. पण त्याचा घात पण होऊ शकतो. त्यांनी जसे बी तसे फळ येते असे उदाहरण दिले आहे. मनरुपी बीज शुद्ध भावाचे असेल तर त्यापूजेपासून होणारं फळ समाधान देईलच म्हणून असे भजन करा ज्याने मनाला समाधान पावेल. संत सावता माळी तर कांदा मूळा भाजी अवघी विठाई माझी म्हणतात. सुभद्रा चहाण या हिंदी कवियत्री होऊन गेल्या. यांची प्रसिद्ध रचना आहे. ठुकरा दो या प्यार करो. इतर लोकांनी देव पूजा करायला खूप आणलय माझी ऐपत नाही. मी फक्त नमस्कार करते. पण तो मनोभावे करते पाहिजे असेल तर स्विकार करा नाहीतर अव्हेर कर। समर्पण भाव शुद्ध अंतःकरण असे भजन देवाला पावल्याशिवाय कसे राहील?

***

अभंग क्र. ४५

मन ओळो मना। बुद्धी बुद्धी क्षण क्षणा।।१।।
मीच मज राखण जालो । ज्याने तेथे चिधरिलो ।।२।।
जे जे जेथे उठी तेथेचि धरिलो भांजणी ते ते तया हाते खुंठी ।।३।।
भांजिली खांजनी । तुका साक्ष उरला दोन्ही ।।४।।

किती छान कल्पना आहे. मनाचे द्वंद्व दाखवले आहे. माझेच मन माझ्याच मनाला कळवते. म्हणजे भटकायला लागले की सांगते. ठिकाणावर माझी बुद्धी भरकटलेल्या बुद्धीला म्हणते कुळ व चांगला विचार कर.

त्यामुळे मीच माझ्या प्रवृत्तीरुपी मनाचा राखणदार झालो आहे. त्याला एका ठिकाणी स्थिर केले आहे. मनात जे विकार उत्पन्न होतात त्यांना तिथल्या तिथे नाहिसे करतो. जसा गुराखी गायींना चारायला नेतो पण कुंपणाबाहेर जाऊ देत नाही. माऊलींनी सुद्धा मनाचे एक निके म्हटले त्याला जे आवडते ते करण्यासाठी ते सोकावते म्हटले आहे. म्हणून माऊली म्हणतात आत्मानुभाचे सोहळे मनाला दाखवावेत. शेवटी म्हणतात कितीही मन भरकटले खड्ड्यात गेले तरी त्या मनाला मी आवरु लागलो आहे. त्या दोन्ही अवस्थेला मी साक्षी भावाने पहात आहे. मी हे सर्व अनुभवताना वेगळा दिसतो आहे. जाणीव नेणोवेच्या पलिकडे गेलो की आत्मस्वरुपी लीन होता येते व सगळ्या मनाच्या प्रवृत्तीवर अवस्थेचे साक्षी होता येते. मनाची शक्ती आपणास वापरून अंतःकरण निग्रह भक्तीसाठी करता येणे शक्य आहे हे महाराज अलगदपणे इथे सुचवितात.

***

अभंग क्र. ४६

पोटा पुरते देई विठ्ठला मागणे ।
लई नाही बा लई नाही ॥१॥
पोळी साजूक अथवा शिळी ।
देवा देई भुकेच्या वेळी ॥२॥
वस्त्र नवे अथवा जुने ।
देई अंग भरुनी ॥२॥
देवा कळणा अथवा कोंडा ।
आम्हा देई भुकेच्या तोंडा ॥३॥
तुका म्हणे आता ।
नका करु पाया परता ॥४॥

मुद्दाम हा मागणीचा सोपा अभंग घेतला आहे. आनंद भाटे यांच्या आवाजात ऐकल्यावर याची भूरळ पडली.

त्यांच्या आराध्य देव असलेल्या विठ्ठलाकडे उदरनिर्वाहासाठी जगण्यासाठी काय मागावे? महाराजांनी म्हटले आहे. गरजे पुरते! माझी गरजच एकदम जगण्याला आवश्यक तेवढीच आहे. त्यापेक्षा जास्त देवू नको. तेवढेच दे.

साजूक पोळी म्हणजे सात्त्विक आहार जमले तर दे. नाहीतर शिळी पोळी जेवायच्या वेळी भूकेच्या वेळी दिली तरी चालेल.

वस्त्राची गरज कशाला? अंग झाकण्यासाठीच ना! नवीन कपडे घालायला मिळाले तर ठीक नसले तर जुने सुद्धा घालेल मी. माझे अंग पूर्ण झाकले म्हणजे

झाले. उंची पोशाख, रेशमी–तलमी वस्त्र मी मागतच नाही. भूक लागली तर कळण्याची भाकरी पण चालेल. पोटाच्या ऐवजी कोंडा चालेल. निजेला धोंडा भुकेला कोंडा ही म्हण आहेच की. मला एक प्रसंग इथे आठवतो. मला नोकरी लागल्यावर मी चुलत्यांना, आमच्या दादांना मी टेरिकॉटचे शर्टाचे कापड घेऊन गेलो होतो. ते नको म्हटले. आज दिले कायम असे कोण देईल? त्यापेक्षा नकोच मी हरक कापड वापरतो. सदरा शिवायला, ते पुरेसे आहे.

गांधीजी पंचा नेसत होतेच ना माझे लोक त्यांना जर पुरेसे वस्त्र अंगावर नाही तर मी पोशाखाबद्दल आग्रही का असावे हा त्यांचा दृष्टीकोण.

मी पाया पडून विनंती करतो एवढेच मला दे असे तुकाराम महाराज शेवटच्या चरणात म्हणतात.

माणसाने कशाचाही हव्यास करु नये. मिळाले तर ठीक आहे. भारी वस्त्र, पंचपक्वान्ने साधने हवीत कशाला? गरजा कमी केल्या की सुखाने जगता येते.

मला ग.प्र. प्रधान सरांची आठवण येते. सर्व घरदार–ऑफिस साप्ताहिकाला देऊन शेवटच्या काळी साध्या घरात हडपसर जवळ उंड्रीला राहायला गेले.

***

अभंग क्र. ४७

संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांची भेट झाल्याचा उल्लेख बरेच इतिहासकार पुराव्यानिशी करतात. शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांना नजराणा पाठवला होता व तो त्यांनी स्विकारला नाही. त्याबद्दलचा अभंग प्रसिद्ध आहे. तसेच सैन्य व प्रजा या विषयीचे ११ अभंग पाईकचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत. या पुस्तकात या दोन महाराष्ट्रांच्या दैवतांचा उल्लेख केला नाही तर मी स्वतःला माफ करु शकणार नाही. म्हणून एक अभंग मुद्दाम घेतला आहे. त्याचे निरुपण करण्याचीही आवश्यकता नाही. पाईक म्हणजे सैन्यातील शिपाई. शक्य झाले तर त्याचे छोटे पुस्तक सर्वांना माहिती व्हावी म्हणून प्रकाशित करु.

दिवट्या छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे ।
आता येथे पंढरीराया । मन गोविसी कासया ।
मुंगी आणि राव । आम्हा सारखासी देव ।
गेला मोह आणि आशा । कळीकाळाचा हा फासा ।
सोने आणि माती । आम्हा समान या चित्ती ।
तुका म्हणे आले । घरी वैकुंठ हे सावळे ।।

नजराणा परत करतांना हा अभंग त्यांच्या विनम्रतेचा आदर्श आहे. आम्हाला हा नजराणा कशासाठी? याने आमचे काय कल्याण होणार? ते पंढरीरायाला विनवतात देवा, आम्हाला यात नाहक गुंतवू नकोस. मुंगी हा सूक्ष्म जीव व राव

म्हणजे प्रतिष्ठित उच्च. देवा हे दोन्ही आम्हाला सारखेच. ह्या संसार रुपी भवसागराचा जो पाश आहे तो मोह, आशा, इच्छा कामना याला तर आम्ही केव्हाच तिलांजली दिली आहे.

आमच्या चित्ताची अवस्था आता निर्मम झाली आहे. सोने व माती हे समान भासू लागले आहे. आमच्या घरात म्हणजे या अंतः करणात, हृदयात, मनात ज्यांनी वास केला ते सावळे वैकुंठ आहे. माझा विठ्ठलच आता माझा सखा सोबती सांगाती आहे. वाचकहो शिवाजी महाराजांना अप्रत्यक्ष मदत तुकाराम महाराजांनी केली आहे. समाजामध्ये किर्तन–भजन करुन सामान्य जन एकसंघ ठेवून महाराजांच्या रयतेच्या राज्याला महाराजांचा सहभाग सर्वांनीच लक्षात घ्यावा, असा आहे.

***

अभंग क्र. ४८

संत तुकाराम महाराज यांचा ३३ अभंगाचा हरीपाठ गावीगावी प्रचलित आहे. त्यातील शेवटचा अभंग आपण या पुस्तकात घेत आहोत.

इतुके करी देवा ऐके वचन ।
समूळ अभिमान जाळी माझा ।।१।।
इतुके करी देवा आईके हे गोष्टी।
सर्व समदृष्टी तुज देखे ।।२।।
इतुके करी देवा विनवितो तुज।
संतचरण रज वंदी माथा ।।३।।
इतुके करी देवा आइके ही मात।
ह्रदयी पंढरीनाथ दिवसरात्री ।।४।।
भलतिया भावे तारी पंढरीनाथा ।
तुका म्हणे आता शरण आलो ।।५।।

आपले आराध्य दैवत पंढरपूरचा विठू राया त्या पंढरीनाथाला हे कळकळीचे मागणे यात अतिशय सोप्या ५ मागण्या या अभंगाद्वारे महाराज करतात. माझा अभिमान समूळ नष्ट कर. दोन शब्द महत्त्वाचे आहेत. समूळ व जाळी. अभिमान अहंकार दर्प गर्व हे शिल्लकच राहिला नको असे कर. तो नाहिसा झाल्याशिवाय तुझी प्राप्ती कशी होणार? तुझ्या प्राप्तीतील हा अहंकार दूर कर. शिवाजी महाराजांनी पाठविलेला नजराणा परत पाठवितांना त्यांनी हिच भावना व्यक्त

केली आहे.

दुसरी मागणी दृष्टी सम ठेव म्हणजे तुला पाहता येईल. दृष्टीत चंचलता आली तर तु विन्मुख होण्याचा धोका आहे. ही तळमळ आपल्याला सुद्धा लागायला हवी.

तिसरी मागणी संतचरण रज लावी माथा. संताचा सहवास घडो. त्यांच्या चरणाची धूळ मस्तकी लागो. संताबद्दल असलेली ही दास्यत्वाची भूमिका जगद्गुरु पदी विराजमान असलेल्या संत तुकाराम महाराजांची आहे हे इथे लक्षात घ्या. चौथी एक गोष्ट माझी ऐका. हृदया मध्ये दिवसरात्र म्हणजे २४ तास तुमचा वास असावा. हा सहवास लाभला तर तुम्ही कायम सोबत असल्याने प्रत्येक आचरण, व्यवहार कृती ही तुम्हाला आवडेल अशीच होईल ना। हृदयातील तुमचा सहवासाला अंतर देऊ नका. या वृत्तीमुळेच हिशोबाच्या सावकारी वह्या त्यांनी इंद्रायणी बुडवल्या नष्ट केल्या. **शेतकऱ्यांची कर्जे माफ करणारा हा अवलिया संत जगाच्या पाठीवर सापडणार नाही.**

शेवटी असेही म्हणतात माझा भाव तुजप्रति चांगलाच आहे पण न कळो भाव ढळला तर? तरी मला तार. माझ्या उद्धाराचे व्रत अंगिकारले ना!

तुला अनन्यभावाने मी शरण आलो आहे. आपला हा भाव या पंढरीच्या पांडूरंगा प्रति असाच निर्माण होवो ही त्या विठूरायाकडे कळकळीची प्रार्थना आहे.

***

अभंग क्र. ४९

आता तरी पुढे हाचि उपदेश ।
नका करु नाश आयुष्याचा ।।१।।
सकळाच्या पाया माझे दंडवत ।
आपुलाले चित्त शुद्ध करा ।।२।।
हित ते करावे देवाचे चिंतन ।
करुनिया मन एकविध ।।३।।
तुका म्हणे लाभ होय तो व्यापार ।
करा काय पार शिकवावे ।।४।।

महाराजांचा सर्वांना एकच उपदेश आहे. यापुढे दुसरे काही सांगणार नाही. आयुष्य वाया जाऊ देऊ नका. मग काय करायचे? अगदी सर्वांच्या पायी दंडवत घालून महाराज म्हणतात. चित्त शुद्ध करा. मन एकाग्र करा व आपुले हित कशात आहे ते ओळखा. तुम्ही माझ्या विठ्ठलाचे चिंतन करा. नामस्मरण करा. मनात अद्वैत भाव निर्माण व्हावा

इतके ते विठ्ठलाच्या पायी एकाग्र करा. व्यापारात लाभ असतो हा जो व्यापार सांगतो त्यात लाभ होणारच आहे हे मी अतिशय कळकळीने सांगतो आहे. ह्या पेक्षा किती आणि काय शिकवावे? हा अभंग पुस्तकाची सांगता करतांना मुद्दाम घेतला आहे. विठ्ठलाच्या चिंतनात सर्वांचे हित आहे हे सांगताना अक्षरशः

सकळांच्या पाया महाराज दंडवत घालत आहेत यातून सर्व सामान्यांच्या प्रति किती कळवळ–तळमळ आहे याची कल्पना येते.

***

अभंग क्र. ५०

आनंदाचे डोही आनंद तरंग ।
आनंदाचे अंग आनंदाचे ।।धृ।।
काय सांगो जाले कांहिचिया बाही ।
पुढे चाली नाही आवडीने ।।२।।
गर्भाचे आवडी मातेचा डोव्हळा ।
तेथेचि जिव्हाळा तेथे बिंबे ।।३।।
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा ।
अनुभव सरिसा मुखा आला ।।४।।

आपल्या पुस्तकातील अभंगाची सांगता या अभंगाद्वारे आपण करणार आहोत. अभंगाचे प्रकार पाहिले. त्यात नमनाचे, विनवणी किंवा मागणीचे स्तवनाचे अभंग. तसा हा अभंग पुर्णत्वाचा अभंग आहे. ईश्वर कृपेने व संत तुकाराम महाराज यांच्या कृपेने आपण पुस्तक नरवीर प्रकाशना तर्फे व ई साहित्याद्वारे प्रकाशित करणार आहोत.

स्वतःचा पूर्णत्वाचा अनुभव आल्यावर जी मनाची अवस्था झाला तिचे वर्णन करतांना महाराज म्हणतात मी अशी अवस्था गाठली आहे की सर्व बाजूंनी आनंदच आनंद आहे. आता भोगायचे असे काही उरलेच नाही. माझ्या अंतरंगातील प्रत्येक कणाकणात आनंद भरला आहे. ही अवस्था आत्मज्ञान, स्व-स्वरुप ज्ञान ब्रह्मपदाला गेल्यावरच्या

मनाची आहे आता मन 'निर्मम' व 'निर्मन' झाले आहे. चित्तात ममत्त्व

नाही विचार नाही. आनंदाने बेहोष झाल्याने काय झाले हेच मला कळत नाही. सुंदर रुपक देतात. मातेच्या उदरी जो गर्भ वाढतो तो त्याची इच्छा म्हणजेच डोहाळे तो आईला सांगू शकत नाही. आई मग त्याची इच्छा डोहाळे म्हणून मागते. मला जिजाऊची आठवण झाली. शिवाजी गर्भात असतांना त्याला तलवार चालवावी असे वाटू लागे म्हणायची. अगदी हीच अवस्था भक्तिमध्ये संत तुकाराय महाराज यांची झाली आहे. म्हणून काहीच्या बाही शब्द आला असावा. आईचे डोहळे जसे बाळाचेच असतात तसेच ईश्वरनिष्ठ भक्तांचेही असतात.

विठ्ठलकृपेने हा ठसा अंतरंगात त्यानेच भरवला आहे फक्त वैखरीद्वारे मी प्रकट केला एवढेच.

पूर्ण आनंदीवृत्तीने लिहिलेला हा अभंग आहे. आज भौतिक सुखांचा बोलबाला आहे. वस्तुंची मुबलकता आहे. घराघरात चैनीच्या वस्तुने सुखही दिसते आहे. मात्र आनंद कुठे आहे? समाधान कुठे आहे? आपल्याला आनंदाची दिवेलागण करायची आहे.

महाराजांच्या सर्वत्र अभंगाचे चिंतन मनन अभ्यास करुन अंतःकरण चित्त शुद्ध करु या. विठ्ठल भक्तिची नामस्मरणाची आवड निर्माण करु या. आपण ही आनंदी होवू व जगाला ही आनंद देऊ या.

आपणास हे पुस्तक आवडले तर जरुर कळवा. दुसऱ्या अभंगाच्या निरुपणांची मला प्रेरणा मिळेल ही अपेक्षा व्यक्त करतो.

***



सुरेश पंदारे

संत तुकाराम महाराज
(अभंग दर्शन, चिंतन, निरूपण)

लेखक सुरेश पंदारे यांना वाचन,लेखन,सामाजिक कार्य,संगीत,भक्ती वाङ्मय, अध्यात्म यांची आवड आहे. बँकिंग क्षेत्रात प्रदीर्घ सेवा, काम करून बँक ऑफ बडोदा मधून सेवानिवृत्त झालेले सुरेश पंदारे आपली आवड जोपासत ललितलेखन करीत असतात.आपल्या कार्यालयीन अनुभवांवरून, जीवनातील वास्तववादी प्रसंगातून संवेदनशील, हृदयस्पर्शी भावनांमधून लिहिलेल्या कथांचा शिदोरी हा कथासंग्रह नुकताच नरवीर प्रकाशन तर्फे प्रकाशित झाला आहे.

गेली तीस-बत्तीस वर्षे ज्ञानेश्वरीचे वाचन, संत तुकारामांची अभंगगाथा वाचन, चिंतन, मनन, निरूपण करीत आहेत. यातूनच साकार झालेले संत तुकाराम महाराज (अभंग दर्शन, चिंतन, निरूपण) पुस्तक, ग्रंथ वाचकांना आनंदाचे डोही, आनंद तरंग निर्माण करून भक्तीरसाचा प्रत्यय, आनंद देईल, असे वाटते.

विलास पायगुडे
प्रकाशक
नरवीर प्रकाशन